cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६८ | गुरूवार दि.२८ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### इंधन दरवाढीच्या जखमेवर नफेखोरीचे मीठ

देशात पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या दरात पुन्हा एकदा वाढ झाली आहे. या दरवाढीचे समर्थन करताना सरकारी तेल कंपन्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत असल्याचा युक्तिवाद नेहमीप्रमाणे पुढे केला जात आहे. मात्र प्रत्यक्षातील आकडेवारी पाहिली, तर हा दावा किती फोल आहे हे स्पष्ट होते. सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांनी गेल्या काही वर्षांत कमावलेला प्रचंड नफा आणि केंद्र सरकारने इंधनावरील करांमधून उभा केलेला महसूल पाहता..

# ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांची केंद्राकडून दखल

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत आज झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**



नवी दिल्ली येथे आज महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात श्री. शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची सकारात्मक चर्चा झाली. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### भारताचे पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर

बिजिंग: चीन आणि पाकिस्तान या दोन्ही शेजारी देशांच्या भारताविषयीच्या कुरापतींना नवी दिल्लीने अत्यंत आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या नुकत्याच झालेल्या चीन दौऱ्यादरम्यान दोन्ही देशांनी एक संयुक्त निवेदन जारी केले होते. या निवेदनात जम्मू–काश्मीर आणि लडाखचा विनाकारण उल्लेख करण्यात आला होता. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे वक्तव्य पूर्णपणे फेटाळून लावले आहे. जम्मू–काश्मीर आणि लडाख हे भारताचे अविभाज्य भाग होते, आहेत आणि नेहमीच राहतील, अशा स्पष्ट शब्दांत भारताने दोन्ही देशांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या विषयावर भारताची अधिकृत भूमिका मांडली.

### रेल्वे स्थानकांवरील दरवाढीला स्थगिती

मुंबई: मध्य रेल्वेच्या स्थानकांवरील मायनर स्टॅटिक कॅटरिंग युनिट्समध्ये विक्री होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या दरवाढीचा निर्णय रेल्वे प्रशासनाने तात्पुरता स्थगित केला आहे. १ जून २०२६ पासून नव्या दरांची अंमलबजावणी होणार होती. मात्र, पुढील आदेश येईपर्यंत ही दरवाढ लागू करण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला असून, नव्या दरानुसार २० रुपयांना मिळणारा वडापाव सध्या तरी पूर्वीप्रमाणेच १३ रुपयांनाच उपलब्ध राहणार आहे. रेल्वे प्रशासनाने यापूर्वी २५ मे २०२६ रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे खाद्यपदार्थांच्या सुधारित दरांची घोषणा केली होती.

### माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर ईडीची धाड

तिरूअनंपुरम: केरळचे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन आणि त्यांच्या मुलीच्या निवासस्थानांवर एका कथित लाचखोरी प्रकरणाच्या संदर्भात टाकण्यात आलेल्या छाप्यांविरोधात सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान, बुधवारी तिरुवनंतपुरम येथे सीपीआय (एम) च्या कार्यकर्त्यांनी अंमलबजावणी संचालनालयाच्या अर्थात ईडी अधिकाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनावर हल्ला केला. छापेमारीनंतर परत जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ईडी पथकाच्या वाहनाला, ज्यामध्ये महिला अधिकारीही होत्या, पक्ष कार्यकर्त्यांनी अडवले. केंद्रीय तपास यंत्रणेविरोधात घोषणाबाजी करत त्यांनी विटा आणि सळ्यांच्या साहाय्याने वाहनाच्या समोरची काच (विंडस्क्रीन) फोडली. या ताफ्यात ईडी चे चार अधिकारी आणि सीआरपीएफ चे आठ जवान यांचा समावेश होता; या घटनेत वाहनावरील चालकांपैकी एक जण जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सीआयडी कुचकामी यंत्रणा, केवळ बिनकामाचे ओझे!

## रोहित पवारांचा थेट हल्ला, दादांच्या मृत्यू प्रकरणात मुख्यमंत्र्यांकडे हस्तक्षेपाची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्यातील तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूच्या तपासावरून रोहित पवार यांनी राज्य सरकार आणि विशेषत: गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तोफ डागली आहे. ''सीआयडी सारखी यंत्रणा सध्या पूर्णपणे कुचकामी ठरली**



**असून, ती सरकारवर केवळ बिनकामाचे ओझे आहे,'' अशा कडक शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.**

जानेवारी महिन्यात बारामती येथे झालेल्या एका दुर्दैवी विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. या घटनेला आता चार महिने लोटले असूनही तपासात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. या पार्श्वभूमीवर बोलताना रोहित पवार म्हणाले की, अजितदादांच्या अपघात प्रकरणात सीआयडी नेमका काय तपास करत आहे, हेच कोणाला कळेनासे झाले आहे. ज्या गतीने आणि ज्या पद्धतीने ही चौकशी सुरू आहे, ते पाहता या यंत्रणेच्या अस्तित्वावरच शंका येते. अशा निष्क्रिय यंत्रणा जनतेच्या कराराच्या पैशांवर चालणारे ओझेच आहेत. रोहित पवार यांनी या प्रकरणात मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे. ''एका मोठ्या नेत्याचा अपघाती मृत्यू होतो आणि राज्याची प्रमुख ▶▶ पान २ वर

### सीआयडी कार्यालयात आज धडक देणार

तपास यंत्रणेच्या उदासीनतेमुळे रोहित पवारांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांनी जाहीर केले की, गुरूवारी सकाळी १०.३० वाजता त्यांनी सीआयडी कार्यालयाची भेट निश्चित केली आहे. या भेटीदरम्यान ते तपासाच्या प्रगतीबाबत जाब विचारणार आहेत. ''आम्ही आतापर्यंत लोकशाही आणि सनदशीर मार्गाने आमची बाजू मांडत होतो, परंतु जर सीआयडीला ही साधी आणि कायदेशीर भाषा समजत नसेल, तर आम्हाला त्यांच्याशी वेगळ्या भाषेत संवाद साधावा लागेल,'' असा गंभीर इशाराही त्यांनी दिला आहे.

# शरद पवार पुन्हा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, यात काळजीचे कोणतेही कारण नसून, ते केवळ नियमित वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात गेले आहेत.**



शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत कोणतीही गंभीर बाब नाही. त्यांच्या नियमित चाचण्या पूर्ण झाल्यानंतर त्यांना लवकरच रुग्णालयातून डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते, नेते आणि राज्यभरातील त्यांच्या चाहत्यांनी प्रकृतीबाबत कोणतीही चिंता करू नये, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.यापूर्वी एप्रिल महिन्यातदेखील शरद पवार यांना रुग्णालयात ▶▶ पान २ वर



# पुढचे ३ दिवस पावसाचा इशारा

पुणे । प्रतिनिधी


उत्तर भारतातील तीव्र उष्णता आणि उष्णतेच्या लाटेने त्रस्त असलेल्यांना दिलासा मिळणार आहे. हवामान विभागाने २८ मे पासून दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि राजस्थानसह अनेक राज्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि गारपिटीचा अंदाज वर्तवला आहे. हवामानातील या ▶▶ पान २ वर

# दोन जागांवरुनच अडलंय घोड

## विधानपरिषदेचा तिढा मुंबईतच सुटणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचं लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विधानपरिषद निवडणुकांच्या१७ जागांसाठी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून, केवळ दोन ते तीन जागांवर अंतिम निर्णय होणे बाकी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागांवर शिवसेनेसोबत (शिंदे गट), तर पुण्याच्या जागेवरून राष्ट्रवादी काँग्रेससोबत (अजित पवार गट) भाजपची सध्या सकारात्मक चर्चा सुरू आहे. मित्रपक्षांचे नेते एकत्र बसून यावर अत्यंत सन्मानजनक तोडगा काढतील, असेही त्यांनी



स्पष्ट केले. राजधानी दिल्लीत केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्यासमवेत साखर उद्योगसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर नेत्यांची बैठक होती, त्यासंदर्भाने चर्चा करण्यासाठी आलो होतो, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच, ▶▶ पान २ वर

# पंढरपुरात 'व्हीआयपी' दर्शन पूर्णपणे बंद



पंढरपूर । प्रतिनिधी

अधिक मासानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे चंद्रभागा स्नान आणि श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी देशभरातून लाखो भाविक दाखल होत आहेत. भाविकांची ही वाढती गर्दी लक्षात घेता, सर्वसामान्य वारकऱ्यांना सुलभ आणि जलद दर्शन मिळावे, यासाठी मंदिर प्रशासनाने ▶▶ पान २ वर

# आसाराम बापूची जन्मठेपेची शिक्षा कायम



जोधपूर । वृत्तसंस्था

अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू आसाराम बापू याला सुनावण्यात आलेली जन्मठेपेची शिक्षा राजस्थान हायकोर्टाने कायम ठेवली आहे. विशेष सत्र न्यायालयाने २०१८ मध्ये सुनावलेल्या शिक्षेविरोधात आसारामने केलेले अपील उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. मात्र त्याला अंशतः दिलासा देत सामूहिक बलात्कार (गँगरेप) आणि गुन्हेगारी कट रचण्याच्या आरोपातून त्याची निर्दोष मुक्तता केली आहे. आसाराम सध्या वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामिनावर बाहेर आहे, मात्र न्यायालयाने त्याला त्वरित आत्मसमर्पण करण्याचे निर्देश दिले आहेत.

२०१३ मध्ये जोधपूर येथील आश्रमात आसारामने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये केळीच्या बागेला आग साडेपाच हजार झाडे जळून खाक

बीड । प्रतिनिधी

मोहखेड येथे केळीच्या बागेला आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीमुळं संपूर्ण केळीची बाग जळून खाक झाली आहे. चार एकरावर ही केळीची बाग होती. तर काही दिवसात बागेतील केळी बाजारात पाठवली जाणार होती. मात्र आज दुपारी लागलेल्या आगीत बागेतील साडेपाच हजार केळीचे झाडे जळाले आहेत. त्यामुळं आधीच संकटात असलेल्या केळी उत्पादकाचे ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२७ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १७८.५० क्विंटल | २,००० | २,६३१ | २,३६३ |
| ज्वारी/हायब्रिड: २४५.०० क्विंटल | २,००० | ४,५०१ | २,७११ |
| मका/लोकल: ८.५० क्विंटल | १,९४० | १,९४० | १,९४० |
| तूर : १०.५० क्विंटल | ७,४११ | ७,४१७ | ७,४१४ |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: १६४.५० क्विंटल | २,२०० | २,७०० | २,३९७ |
| मुग: -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:-- क्विंटल | -- | -- | -- |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,००० | ५,७५० | ५,४७२ |

# एसआयआर प्रक्रिया वैधच!

## सुप्रीम कोर्टाचे स्पष्टीकरण; निवडणूक आयोगाला मोठा दिलासा



दिल्ली । वृत्तसंस्था

**बिहारमधील मतदार यादीच्या 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एसआयआर) प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेला वैध आणि घटनात्मक मान्यता देत, ती गैर–संवैधानिक ठरवता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे.**

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने बुधवारी (२७ मे) हा निर्णय दिला. न्यायालयाने म्हटले की, ''मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी अशा प्रक्रियांची गरज आहे.'' सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाने एसआयआर प्रक्रिया सुरू करताना आपल्या घटनात्मक अधिकारांच्या मर्यादेत राहून काम केले आहे. आयोगाने आपल्या अधिकारांचा गैरवापर केला नाही. न्यायालयाने म्हटले, ''ही प्रक्रिया सामान्य मतदार यादी पुनरावलोकनापेक्षा वेगळी असली, तरी ती बेकायदेशीर किंवा असंवैधानिक ठरत नाही.'' तसेच, प्रक्रियेत काही नावे वगळली गेली म्हणून ती नियमबाह्य आहे, असे म्हणता येणार नाही, असेही कोर्टाने स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांनी असा दावा केला होता की, एसआयआर प्रक्रियेमुळे मतदारांवर स्वतःची नागरिकता आणि ▶▶ पान २ वर

### यावरून निर्माण झाला होता वाद

बिहारमधील एसआयआर प्रक्रियेच्या वैधतेला आव्हान देण्यात आले होते. याचिकाकर्त्यांच्या मते, निवडणूक आयोगाने संविधानातील अनुच्छेद ३२६ आणि लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० अंतर्गत दिलेल्या अधिकारांच्या पुढे जाऊन ही प्रक्रिया राबवली. विशेषतः २००२ (काही राज्यांमध्ये २००३) च्या मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांना नागरिकत्वाचे पुरावे सादर करण्याची अट वादाचा मुख्य मुद्दा ठरला होतो. मात्र, दीर्घ सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने अखेर निवडणूक आयोगाच्या भूमिकेला दुजोरा देत ही प्रक्रिया घटनात्मक आणि कायदेशीरदृष्ट्या वैध असल्याचा निर्णय दिला आहे.

# नदीजोड प्रकल्पासंदर्भात केंद्र सरकार सकारात्मक

दिल्ली । वृत्तसंस्था



महाराष्ट्रातील साखर उद्योग, कांदा उत्पादकांचे प्रश्न मांडण्यासाठी आणि जलजीवन मिशनच्या कामांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर आहेत. बुधवारी (दि. २७ मे) दुपारी दिल्लीतील जलसंपदा विभागात जलजीवन मिशन आढावा बैठक झाली. या बैठकीनंतर बोलताना, मुख्यमंत्री फडणवीस यांनी पंतप्रधान कृषी सिंचन योजनेअंतर्गत राज्याला केंद्राकडून अधिक निधी मिळणार असल्याचे संकेत दिले. तसेच महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पासंदर्भात केंद्र सरकार सकारात्मक असल्याचेही त्यांनी सांगितले.

पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत ज्या काही आपल्याला योजना मिळालेल्या आहेत. त्याचा आढावा घेण्यात आला. त्यात अधिकचे पैसे पाहिजे आहेत. ते पैसे मागितले असून, त्यावर सकारात्मक चर्चा झाली असल्याचे फडणवीस म्हणाले. व्हीबी–जी राम जी योजना सुरु झाली असून, यात जलसंधारणाला अधिक महत्त्व देण्यात आले आहेत. यामध्ये डार्क झोनसाठी (भूगर्भातील पाण्याची पातळी खालावणे) व्हीबी–जी राम जी मधून ६५ टक्के पैसे मिळतील. सेमी डार्क झोनमध्ये ४५ टक्के ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# इंधन दरवाढीच्या जखमेवर नफेखोरीचे मीठ

देशात पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या दरात पुन्हा एकदा वाढ झाली आहे. या दरवाढीचे समर्थन करताना सरकारी तेल कंपन्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत असल्याचा युक्तिवाद नेहमीप्रमाणे पुढे केला जात आहे. मात्र प्रत्यक्षातील आकडेवारी पाहिली, तर हा दावा किती फोल आहे हे स्पष्ट होते. सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांनी गेल्या काही वर्षांत कमावलेला प्रचंड नफा आणि केंद्र सरकारने इंधनावरील करांमधून उभा केलेला महसूल पाहता, सामान्य जनतेवर पुन्हा दरवाढीचे ओझे टाकण्याची कोणतीही नैतिक गरज उरत नाही. तरीही सातत्याने होणाऱ्या इंधनदरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, उद्योग आणि वाहतूक क्षेत्र आर्थिक कोंडीत सापडले आहेत.

जानेवारी ते मार्च २०२४ या तिमाहीत सरकारी तेल कंपन्यांनी जवळपास २५ हजार कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपन्यांच्या नफ्यात मोठी वाढ झाली आहे. याचा अर्थ असा की, या कंपन्या तोट्यात नसून उलट मोठ्या प्रमाणावर आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात किंचित वाढ झाली म्हणून लगेच देशांतर्गत इंधनदर वाढवणे ही केवळ आर्थिक गरज नसून नफेखोरीची मानसिकता असल्याचा आरोप सामान्य जनतेतून होत आहे.

विशेष म्हणजे, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरले असताना त्याचा लाभ देशातील ग्राहकांना कधीच पुरेसा प्रमाणात देण्यात आला नाही. कच्च्या तेलाचे दर कमी झाले, तेव्हा केंद्र सरकारने उत्पादन शुल्क वाढवून स्वतःचा महसूल वाढवला. तेल कंपन्यांनीही किरकोळ दर पूर्ववत ठेवून अब्जावधी रुपयांचा नफा कमावला. त्यामुळे ''कच्च्या तेलाच्या दरांवर देशातील इंधनदर अवलंबून असतात'' हा सरकारचा युक्तिवाद एकतर्फी आणि सोयीस्कर वाटतो.

गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्कातून लाखो कोटी रुपये जमा केले आहेत. या महसुलाचा मोठा भाग सामान्य जनतेच्या खिशातून गेला आहे. पेट्रोल आणि डिझेल हे केवळ वाहनांसाठी लागणारे इंधन नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे कार्य करणारे घटक आहेत. इंधनदर वाढले की वाहतूक खर्च वाढतो, त्याचा परिणाम भाजीपाला, धान्य, दूध, बांधकाम साहित्य, औद्योगिक उत्पादन, बसभाडे, मालवाहतूक आणि शेतीच्या खर्चावर होतो. अखेरीस महागाईचे ओझे सामान्य नागरिकांच्या खांद्यावर येऊन पडते. शेतकरी वर्गावर याचा सर्वाधिक परिणाम होतो. ट्रॅक्टर, पंप, वाहतूक आणि शेतीमाल बाजारात नेण्याचा खर्च वाढल्याने उत्पादनखर्च प्रचंड वाढतो. आधीच नैसर्गिक संकटे, खतांच्या किमती आणि कर्जाच्या ओझ्याने दबलेला शेतकरी इंधनदरवाढीमुळे आणखी अडचणीत सापडतो. दुसरीकडे, मध्यमवर्गीय नोकरदारांचे मासिक बजेट कोलमडते. रोज कामासाठी वाहन वापरणाऱ्या लाखो नागरिकांना दरवाढ म्हणजे थेट आर्थिक फटका ठरतो.

सध्या पश्चिम आशियातील तणाव आणि युद्धामुळे कच्च्या तेलाच्या दरात चढउतार होत असल्याचे सांगितले जात आहे. पण देशातील तेल कंपन्या आणि केंद्र सरकारने मागील अनेक वर्षांत कमावलेले प्रचंड नफा पाहता, या वाढीचा काही प्रमाणात भार स्वतः उचलणे शक्य होते. सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी उत्पादन शुल्कात कपात करता आली असती, तेल कंपन्यांच्या नफ्यातून काही हिस्सा वापरता आला असता किंवा दरवाढ टप्प्याटप्प्याने लागू करता आली असती. पण तसे काहीही न करता थेट ग्राहकांवर भार टाकण्यात आला. याहून गंभीर बाब म्हणजे, दरवाढ करूनही अनेक भागांत इंधनटंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अनेक पेट्रोलपंपांवर रांगा लागत आहेत, काही ठिकाणी डिझेल उपलब्ध नसल्याचे फलक दिसत आहेत. म्हणजेच जनतेला महाग इंधन तर घ्यावेच लागत आहे, पण ते वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात मिळेल याचीही खात्री उरलेली नाही.

सरकारने विकास, अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधा याबाबत मोठमोठे दावे करणे वेगळे आणि प्रत्यक्षात सामान्य नागरिकांच्या जीवनमानाकडे संवेदनशीलतेने पाहणे वेगळे. गेल्या काही वर्षांत इंधनदरवाढीच्या प्रश्नावर सरकारची भूमिका सातत्याने जनविरोधी असल्याची भावना निर्माण झाली आहे. जनतेच्या अडचणींपेक्षा महसूल आणि कंपन्यांचा नफा अधिक महत्त्वाचा मानला जात असल्याचे चित्र आहे.

लोकशाही व्यवस्थेत सरकार हे केवळ महसूल गोळा करणारे यंत्र नसते; ते जनतेच्या हिताचे रक्षण करणारे माध्यम असते. इंधनासारख्या मूलभूत गरजेच्या बाबतीत तरी सरकारने संवेदनशीलता दाखवणे अपेक्षित आहे. आजवर इंधनातून कमावलेल्या अब्जावधी रुपयांचा काही भाग जनतेला परत दिलासा म्हणून देणे शक्य होते. पण त्याऐवजी वारंवार दरवाढ करून नागरिकांच्या सहनशक्तीची परीक्षा घेतली जात आहे.

देशातील नागरिकांनी कररूपाने, इंधनदरांच्या माध्यमातून आणि महागाईच्या स्वरूपात मोठी किंमत मोजली आहे. त्यामुळे आता जनतेच्या संयमाचा अंत पाहू नये. सरकार आणि तेल कंपन्यांनी नफ्याच्या आकड्यांपेक्षा सामान्य माणसाच्या जगण्याकडे पाहिले नाही, तर ही नाराजी पुढील काळात अधिक तीव्र होऊ शकते.

# 'निष्ठेला मरण नाही, गद्दारीला थारा नाही, उल्हास भैय्या चा बाणा शिवसेने शिवाय काहीच नाही'



**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निष्ठावंत शिलेदार, लोकसेवेचा वसा घेतलेले,'' जनसेवा हीच ईश्वर सेवा '' हे ब्रीद घेतलेले , तरुणांचे प्रेरणास्थान , सर्वसामान्य जनतेच्या हकेला धावून जाणारे , शांत संयमी आणि निर्भीड शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम यांचा आज वाढदिवस त्यांना वाढदिवसानिमित्त लाख लाख शुभेच्छा.**

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या शिवसेनाप्रमुख हिंदुरुदय सम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर आकर्षित होऊन युवा दशेतच शिवसैनिक म्हणून काम सुरू केले. बाळासाहेबांचे विचार पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांची भूमिका व आदित्यजी ठाकरे साहेबांचे विकासाचे व्हिजन घेऊन जनतेपर्यंत पोहोचत राहिले शिवसेनेत सक्रिय काम करत असताना त्यांच्या कामाची दखल घेऊन पक्षाने त्यांना बीड शहर प्रमुख पदाची जबाबदारी दिली दिलेल्या जबाबदारीवर त्यांनी अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करत त्यांनी अल्पावधीतच बीड तालुका प्रमुख पदावर मजल मारली. तालुकाप्रमुख पदावर कार्यरत असताना त्यांनी प्रत्येक ग्रामीण भागातील गाव वाडी वस्तीवर शिवसेना पोहोचविण्याचे कार्य केले गाव तिथे शाखा व घर तिथे शिवसैनिक निर्माण केले शिवसेनेच्या काही गद्दारांनी सत्तेसाठी शिवसैनिक फूट पाडून वेगळा गट तयार केला त्यावेळेस बीड जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी व शिवसैनिक खोट्या आमिषाला बळी पडले, परंतु शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम हे कसल्याच आमिषाला बळी न पडता पक्षप्रमुख श्री उद्धव साहेबांसोबत निष्ठेने व प्रामाणिकपणे राहिलेतो गद्दारांना धडा शिकविण्यासाठी त्यांनी हजारो शिवसैनिकांसोबत बीड ते शिवतीर्थ मुंबई येथे निष्ठा पदयात्रा काढली व आम्ही सारे पक्षप्रमुख उद्धवजी साहेबांसोबतच आहोत हे राज्याला दाखवून दिले. जिल्हाप्रमुख म्हणून निवड झाल्यानंतर जोमाने पक्ष वाढीसाठी सुरुवात केली संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकविण्याचा संकल्प करत आपले नेतृत्व गुण दाखवले शिवसेना पक्ष वाढीस सोबतच त्यांनी पाणी प्रश्न, महागाईचे वाढते ओझे, शेतकऱ्यांची कर्जमाफी, रस्त्यांची दुरावस्था अभाव या मुद्द्यावर आक्रमक पवित्र घेऊन प्रशासनाला ज्या विचारला व जनतेला न्याय मिळवून दिला. जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम हे केवळ आंदोलनामुळे मर्यादित राहिले नाही तर त्यांनी प्रत्येक समाजाशी दांडगा संपर्क ठेवला व विविध समाजात आपुलकीचे नाते निर्माण केले. उल्हास भैय्या यांचा आणखी एक गुण म्हणजे ते कुठल्याही आवाहनाला सामोरे जात त्या आव्हानाचे त्यांनी संधीत रुपांतर केले. '' भगवा आहे श्वासात बाळासाहेब ध्यासात, उद्धव साहेबांच्या विचाराशी निष्ठा आहे रक्तात, जनतेच्या सेवेसाठी अविरत झटणार अवलिया उल्हास भैया गिराम यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.

भाई संजय महाद्वार

# आजोबा आणि चुलत भावाचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**नेकनूर । वार्ताहर**

**आजोबा नात, भाऊ- बहीण या नात्याला काळीमा फासणारी घटना नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात घडली. साठ वर्षीय आजोबाने पंधरा वर्षाच्या अल्पवयींन नातीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. हे कमी की काय म्हणून पिडीतेचा चुलत भाऊ देखील मुलीवर वारंवार अत्याचार करत असल्याची बाब समोर आल्याने खळबळ माजली आहे. याप्रकरणी आजोबा व चुलत भाऊ यांच्यावर पोक्सो ऍक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे एका आरोपीला पोलिसांनी जेरबंद केले आहे.**



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार एका गावात आजोबा आज्जी सोबत राहणाऱ्या पंधरा वर्षाच्या मुलीचे आई-वडील बाहेरगावी कामाला निघून गेलेले आहेत. सध्या शाळेला सुट्ट्या असल्याने आज्जी आणि इतर भावंडे शेतात शेळ्या चारण्यासाठी निघून गेले. मुलगी घरी एकटी असल्याचे पाहून आजोबांनी ती जेवण करत असतानाच तिला बळजबरीने ओढून नेले तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.कोणाला सांगितले तर जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना घडल्यानंतर दोन चार दिवसांनी पोटात दुखू लागल्याने हॉस्पिटल मध्ये गोळ्या औषधं घेतली पण फरक पडला नाही. पुन्हा डॉक्टर कडे गेल्यावर महिला डॉक्टरांनी विश्वासात घेऊन विचारल्यावर पिडीतेने आपबीती सांगितली. त्यानंतर डॉक्टरांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. याप्रकरणी.नेकनूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धक्कादायक म्हणजे पीडिता शेळ्या चरण्यासाठी गेली असता. तिचा चुलत भाऊ हा शेळ्या चारण्यासाठी पीडीता गेल्यानंतर शेतामध्ये जबरदस्ती लैंगिक संबंध ठेवत होता.असा उल्लेख देखील तक्रारीत करण्यात आला आहे. हा प्रकार फक्त तिच्या एकटी सोबतच झाला नाही तर इतर लहान बहिणी सोबतही चुलत भाऊ असाच अत्याचार करत होता असा देखील तक्रारीत उल्लेख आहे. चुलत भावाने घरात कोणीही नाही अस पाहून एका दिवशी बळजबरीने अत्याचार केला. त्यामुळे आजोबा आणि चुलतभावा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाईट गूण, प्रवृत्तीचा त्याग करा-गौरव कृष्ण गोस्वामीजी

## जिल्हाधिकारी मित्तल यांची उपस्थिती: फुलांच्या होळीने विश्राम!

**जालना । प्रतिनिधी**

कोट्यावधी रुपये खर्च करून निर्माण केलेल्या सिनेमातून समाजात दुर्गंधी पसरवली जाते.भागवत कथा,प्रभू नामस्मरणाने मन:शुध्दी, शांती , परिवर्तन येते.शरीर,घर,शहर स्वच्छ ठेवा, खोटे बोलणे, मांसाहार,मद्यासह वाईट गूण-दोष ,प्रवृत्तीचा त्याग करून हरे कृष्णा सत्संग समितीच्या धर्म जागृती कार्यात सहभागी व्हा , असे आवाहन आचार्य परमपूज्य गौरव कृष्ण गोस्वामीजींनी केले . '' आज बिरज मे,होरी रे रसिया..., नंदलाल पे गुलाल पे बरसत है...., रस बरसाने वाली...अशा भक्ती गीतांवर भाविकांनी फुलांची उधळण, बेधुंदपणे नृत्य करत साक्षात वृंदावनातील होळीचा अनुभव घेतला.

हरे कृष्णा सत्संग समितीच्या वतीने वेदमाता गायत्री मंदिर परिसरातील वृंदावन धाम येथे आयोजित श्रीमद्? भागवत कथेत श्रीमद्? भागवत कथा सोहळ्यात बुधवारी (२७) परमपूज्य गौरव कृष्ण गोस्वामीजी यांनी अमृतमय वाणीतून सुदामा चरित्र,नवयोगेश्वर संवाद,परीक्षित मोक्षाचे विवेचन केले.फुलांच्या होळी महोत्सवाने कथेचा विश्राम झाला. प्रारंभी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल,मुख्य यजमान गोपाल गोयल , समितीचे अध्यक्ष घनश्यामदास गोयल, हरे कृष्णा सत्संग समितीचे अध्यक्ष किशोर तिवारी, आशीष रसाळ, यांच्या हस्ते आरती करण्यात आली. अधिक मासात नामसंकीर्तन, पर्जन्य वृष्टी यामुळे ज्ञानकथायज्ञ यशस्वी झाला असे सुरुवातीलाच स्पष्ट करत .पती- पत्नी पैकी एक आग तर दुसऱ्याने पाणी झाले तर घर व्यवस्थित चालते.संताची भूमी असलेल्या महाराष्ट्रातील संतांनी धैर्य, सहनशीलता किती असावी हे जगाला दाखवले असून मुलांवर चांगले संस्कार करा, समाजात असे कार्य करुन जा की, तुमचा




आदर्श इतरांनी सदैव दिला पाहिजे असे गौरव कृष्ण गोस्वामीजींनी नमूद केले. भौमासूर वध, जरासंध उध्दार, सुदामा चरित्र, नवयोगेश्वर संवाद, परीक्षित मोक्षाचे विवेचन त्यांनी केले.'' राधे तेरे चरनो की,धुल मिल जाये, वृंदावन का कण -कण बोले श्रीराधा,राधा...!'' अशा संगीतमय नामसंकीर्तन भक्ती गीतांनी चैतन्य निर्माण केले. शेवटी मुख्य यजमानांसह नगरसेविका सौ.सुशीलाताई दानवे, पवन जोशी, सौरभ पंच,नरेश केलानी, राजेंद्र सारस्वत आणि समिती सदस्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. , महिला व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान १ वरून...

## ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांची

राजे भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ राहुल आहेर, विनय कोरे, राहुल कुल, अभिमन्यु पवार, विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे , साखर आयुक्त संजय कोलते आधी या बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेतील मुद्द्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे श्री. शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य सरकारसोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' ( किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य सरकारकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले. नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले.यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली .

--------------

## शरद पवार पुन्हा ब्रीच

दाखल करण्यात आले होते. शरद पवार दिल्लीहून आल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे उपचारासाठी त्यांना ॲडमिट करण्यात आले. दोन दिवसांत डिस्चार्ज मिळणार होता मात्र डॉक्टरांनी आराम करण्याचा सल्ला दिल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्येच ठेवण्यात आले होते. यावेळी देखील रुटीन चेकअपमुळे शरद पवारांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

------------

## सीआयडी कुचकामी यंत्रणा, केवळ

तपास यंत्रणा हात जोडून बसते, हे चिंताजनक आहे,'' असे ते म्हणाले. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी काही तीक्ष्ण प्रश्न उपस्थित केले आहेत. ''राजकीय नेत्यांसाठी मैत्रीची व्याख्या सामान्य जनतेपेक्षा वेगळी असते का?'' असा मर्मभेदी सवाल करत त्यांनी या प्रकरणातील तपासाच्या दिरंगाईवर संताप व्यक्त केला आहे. रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना उद्देशून म्हटले आहे की, अजित पवारांच्या त्या दुर्दैवी विमान अपघाताला आता चार महिने उलटून गेले आहेत. विधीमंडळाच्या अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, या प्रकरणातील गुन्हेगारांना पाताळातूनही शोधून काढले जाईल. तसेच, या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल आणि कर्नाटकात नोंदवलेला 'झिरो एफआयआर' महाराष्ट्रात वर्ग केला जाईल, असेही शब्द सरकारने दिले होते. मात्र, अडीच महिने उलटल्यानंतरही या आश्वासनांची पूर्तता झालेली नाही, असा आरोप रोहित पवारांनी केला आहे.

----------

## पंढरपुरात 'व्हीआयपी'

मोठा निर्णय घेतला आहे. या कालावधीत ''व्हीआयपी'' दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आले असून, दर्शन रांगेत घुसखोरी करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन आणि उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पोलीस, महसूल व मंदिर प्रशासनाने भाविकांच्या सुरक्षेसाठी चोख नियोजन केले आहे. १७ मे ते १५ जून या अधिक मासाच्या काळात दर्शन रांगेत काही इसमांकडून घुसखोरी करून गोंधळ निर्माण केला जात असल्याच्या तक्रारी आल्या होत्या, याची गंभीर दखल घेत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. तसेच नियम तोडणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल केले जातील. विनापरवाना भाविकांना थेट प्रवेश देणे आणि गैरप्रकार करणे याप्रकरणी मंदिर समितीने गांभीर्याने घेत या आधीच गुन्हे दाखल केले आहेत. तसेच गेल्या वर्षभरात अशा प्रकारांत सामील असलेल्या मंदिर समितीच्या दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोघांची विभागीय चौकशी सुरू आहे. तसेच रांगेत घुसखोरी करणाऱ्या ३ ते ५ भाविकांवरही गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. रात्री दर्शन व्यवस्था बंद झाल्यानंतरही अनेक भाविक रांगेत थांबून राहतात, ज्यामुळे त्यांची गैरसोय होते. त्यामुळे भाविकांनी वेळेचे वेळापत्रक पाहूनच दर्शन रांगेत प्रवेश करावा, असे आवाहन मंदिर समितीने केले आहे. कार्यकारी अधिकारी शेळके यांनी स्पष्ट केले की, आषाढी-कार्तिकी यात्रेप्रमाणे अधिक मासात विठ्ठलाचे दर्शन २४ तास सुरू नसते. त्यामुळे भाविकांनी वेळेचे नियोजन करूनच रांगेत उभे राहावे. दर्शनाची वेळ दररोज सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत आहे. रांगेचे प्रवेशद्वार रात्री १० वाजता बंद होते. दर्शन बंद राहण्याची वेळ रात्री साधारण १२.०० ते पहाटे ४.०० पर्यंत असते. पहाटे ४.०० ते ५.०० काकड आरती व नित्यपूजा आणि पुन्हा दर्शन सुरू होण्याची वेळ पहाटे ५.०० वाजता आहे.

-----------

## बीडमध्ये केळीच्या बागेला आग

मोठे नुकसान झाले आहे. शेतात असलेल्या डीपीमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळं ही आग लागल्याची माहिती मिळाली आहे. शॉर्टसर्किटमुळे लागलेली आग संपूर्ण केळीच्या बागेमध्ये पसरली या शॉर्टसर्किटमुळे लागलेली आग संपूर्ण केळीच्या बागेमध्ये पसरली आहे. यावेळी आजुबाजुच्या लोकांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, भर दुपारी आग लागल्याने आटोक्यात आली नसल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. दरम्यान प्रशासनाने या घटनेचा तात्काळ पंचनामा करून तात्काळ नुकसान भरपाई देण्याची शेतकरी रणधिर सोळंके यांनी केली आहे.शॉर्टसर्किटने लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्याच्या घरातील १८ क्विंटल कापूस आणि जीवन उपयोगी साहित्य जळून खाक बीडच्या चिंचाळा इथं देखील आगीची भीषण घटना घडली आहे. या ठिकाणी शॉर्टसर्किटने लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्याच्या घरातील १८ क्विंटल कापूस आणि जीवन उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. आज दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास चिंचाळा येथील शेतकरी यशवंत कुलकर्णी यांच्या घरात शॉर्टसर्किट होऊन भीषण आग लागली. आग विझवण्याकरता परिसरातील लोकांनी अटोकाट प्रयत्न केले. परंतू, ही आग इतकी भीषण होती की या आगीने घरात ठेवलेला १८ क्विंटल कापूस संपूर्णपणे जळाला. यामुळं शेतकऱ्याचे अंदाजे ८ लाख रुपयांचे नुकसान झाले. यासह घरातील साहित्यही जळाले. दरम्यान प्रशासनाने या नुकसानीचा तात्काळ पंचनामा करून मदत देण्याची मागणी शेतकरी कुटुंबाकडून करण्यात आली आहे.

-------------

## दोन जागांवरुनच अडलंय घोड

विधानपरिषद निवडणुकांच्या जागेचा तिढा दिल्लीत नाही तर मुंबईत सोडवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. विधानपरिषदेच्या १७ पैकी १२ जागा भाजप लढवणार असल्याची माहिती असून शिंदेंच्या शिवसेनेला तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज तिन्ही पक्षाचे प्रमुख दिल्लीत होते. त्याच अनुषंगाने महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही या बैठकीनंतर माहिती दिली. विधानपरिषद निवडणुकीबाबत मी पुन्हा सांगतो, आमचं जवळपास ॲग्रीमेंट झालेलं आहे, फक्त शिवसेनेसोबत नाशिक आणि संभाजीनगर येथील जागा आम्हाला मिळाली पाहिजे हा आमचा आग्रह आहे. राष्ट्रवादीने आमच्याकडे पुण्याची जागा मागितलेली आहे, सध्या याच गोष्टींवर आमचं अडलं आहे जे आम्ही सोडवून घेऊ, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषद निवडणुकांवर भाष्य केलं. कठीण पेपर संपलाय, आता सोपा पेपरही आम्ही सोडवून घेऊ, टीकमार्क करायचं बाकी आहे, ते होऊन जाईल. विधानपरिषदेत इतक्या आधी गोष्टी होत नाहीत, त्या वेळेवर होतात. त्यामुळे, उमेदवारी अर्ज भरतेवेळीच सर्वकाही अंतिम होईल, जागावाटप असेल किंवा उमेदवारांची नावे असतील, असेच फडणवीस यांनी सूचवले आहे. गृहमंत्री महोदय आमचे नेते आहेत, त्यांच्यासोबत बसून आम्ही चर्चा करत असतो. मात्र, विधानपरिषदेच्या जागेचा प्रश्न मुंबईतच सोडवला जाईल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पुणे आणि रायगड जिल्ह्यातील जागांसाठी आग्रही आहे, तर शिंदेंची शिवसेना संभाजीनगरची जागा आपल्याकडेच राहावी, यासाठी प्रयत्नशील असल्याचं दिसून येत आहे.

-----------

## पुढचे ३ दिवस

बदलामुळे तापमानही कमी होण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत गेले आहे. उत्तर प्रदेशात, बांदा, प्रयागराज आणि वाराणसीसारख्या भागांमध्ये ४७ ते ४८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २९ मे ते ५ जून दरम्यान देशाच्या अंदाजे ८० ते ९० टक्के भागात मेघगर्जनेसह मान्सूनपूर्व सरी कोसळण्याची शक्यता आहे. हिमालयीन प्रदेशातील सक्रिय पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये आधीच पाऊस पडत आहे. येत्या काही दिवसांत त्याचे परिणाम मैदानी प्रदेशातही जाणवतील. महाराष्ट्राच्या विदर्भ भागात २८ ते ३० मे पर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे. मराठवाडा भागात मान्सूनपूर्व पावसाला आधीच सुरुवात झाली आहे. कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातही २९ मे पर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे.

-----------

## आसाराम बापूची जन्मठेपेची

केल्याचे आरोप झाले. तपासानंतर पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले. एप्रिल २०१८ मध्ये विशेष पोक्सो न्यायालयाने आसारामला दोषी ठरवत नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत (उर्वरित आयुष्यासाठी) जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या निकाला विरोधात आसारामने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. राजस्थान उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अरुण कुमार मोंगा आणि न्यायमूर्ती योगेंद्र कुमार पुरोहित यांच्या खंडपीठासमोर आसारामच्या याचिकेवर सुनावणी झाली. जन्मठेपेची शिक्षा रद्द करण्याची आसारामची याचिका फेटाळताना खंडपीठाने स्पष्ट केले की, भारतीय दंड संहितेअंतर्गत बलात्काराचा आरोप, पोक्सो कायद्यांतर्गत लैंगिक छळाचा आरोप आणि बाल न्याय (जेजे) कायद्यांतर्गत असलेले गुन्हे सिद्ध झाले आहेत. सामूहिक बलात्कार आणि गुन्हेगारी कटाशी संबंधित आरोप कायम ठेवण्यासाठी रेकॉर्डवरील पुरावे पुरेसे नाहीत, असे न्यायालयाने म्हटले. यासोबतच, उच्च न्यायालयाने आसारामचे सहकारी शरदचंद्र आणि शिल्पी यांची सर्व आरोपातून मुक्तता केली आहे. यापूर्वी विशेष न्यायालयाने या दोघांनाही २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली होती. दरम्यान, न्यायालयाच्या निकालानंतर वकील सोळंकी यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाने आसारामच्या शिक्षेला स्थगिती दिलेली नाही. त्याची जन्मठेप कायम आहे. तसेच, पीडितेशी चर्चा केल्यानंतर सह-आरोपींच्या निर्दोष मुक्ततेविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

------------

## नदीजोड प्रकल्पासंदर्भात

आणि बाकी ३० टक्के मिळणार आहेत. त्यादृष्टीने केंद्राचा आग्रह आहे की, विशेषतः जलताराच्या संरचना वाढवल्या पाहिजेत. त्यावर आम्ही त्यांना सांगितले की, आधीच जलयुक्त शिवारच्या माध्यमातून यात काम सुरु केले आहे. एकत्रीकरण करुन हे काम आम्ही निश्चितपणे पूर्ण करु. असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. चौथा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नदीजोड प्रकल्पाचा आहे. नदीजोड प्रकल्प केंद्रापुढे सादर करण्यात आले आहेत. त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे की केंद्रीय जल आगोगाची परवानगी आल्यानंतर त्यावर सकारात्मक विचार करु, अशीही माहिती त्यांनी दिली. आंतरराज्य प्रकल्पात राज्याराज्यांत सहमती होत नाही. त्याला वेळ लागतो. यामुळे राज्यातील अंतर्गत नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य दिले जात आहे. आपल्या प्रकल्पांचे अहवाल केंद्रीय जल आयोगापर्यंत पोहोचले आहेत. त्यांच्या परवानगीनंतर केंद्र सरकारकडे निधीसंदर्भात चर्चा होईल. यावर केंद्राकडून सकारात्मक दाखवण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

-------------

## एसआयआर प्रक्रिया वैधच!

ओळख सिद्ध करण्याचं अतिरिक्त ओझे टाकले जात आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळला. कोर्टाने म्हटले की, एखादी व्यक्ती जुना पत्ता सोडून दुसरीकडे राहत असली, तरी ती पूर्वीच्या मतदार यादीशी पूर्णपणे तुटत नाही. तिचं किंवा तिच्या कुटुंबातील सदस्यांचं नाव जुन्या यादीत असण्याची शक्यता असते. कोर्टाने आणखी एक महत्त्वाचं निरीक्षण नोंदवले. निवडणूक आयोग नागरिकत्व ठरवत नाही, हे स्पष्ट करत न्यायालयाने म्हटले की, जर एखाद्या व्यक्तीची कागदपत्रं संशयास्पद वाटली, तर आयोग त्याला मतदार यादीत समाविष्ट करण्यास नकार देऊ शकतो. मात्र, याचा अर्थ आयोग नागरिकत्वाचा अंतिम निर्णय घेतो, असा होत नाही. अशा संशयास्पद प्रकरणांमध्ये निवडणूक आयोग संबंधित बाब केंद्र सरकारकडे पाठवू शकतो, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. २८ मे २०२६


## थोडक्यात



पिंपळवंडी:-वॉटर ऑर्गनायझेशन ट्रस्ट शेतकरी सहल गंगा व गोमातेचे रक्षण करणाऱ्या वाघोलीत गोबरगॅस पाहतांना प्रकल्पप्रमुख कैलास पन्हाळकर,राजेंद्र जाधव,जलसेवक सोपान शिंदे,मनिषा शेळके,उर्मिला शेळके व शेतकरी बंधू-भगिनी.

### पान टपरी जळून खाक झाल्याने नुकसान, अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा

चौसाळा । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या कानडी घाट तालुका बीड येथील रस्त्यावर असलेली किराणा सामाजनाची पान टपरी आणि त्यामधील असलेले फ्रिज यांच्यासह आदी सामान जळून खाक झाल्याने अतोनात नुकसान झाल्याची घटना घडली सदर प्रकरणी माहिती अशी की सोपान तुळशीराम शेंडगे यांची सुलतानपूर रस्त्यावर आपल्या घरासमोर त्यांनी आपल्या उपजीविकेसाठी पान टपरी टाकून त्यावर आपला उदरनिर्वाह करीत होते दिनांक १९ मे च्या रात्री सदर पानटपडीस आग लावली या आगीत मधील सामाना बरोबर फ्रिज व इतर सामान जळून खाक झाले सोपान तुळशीराम शेंडगे यांनी नेकनूर पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली सदर प्रकरणी पोलिसांनी तातडीने तपास करून मला न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

### बीड येथे ३१ मे रोजी एमपीएससीची पूर्व परीक्षा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतली जाणारी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ आणि गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ रविवार दि.३१ मे २०२६ रोजी बीड शहरातील ६ उपकेंद्रावर पार पडणार आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून एकूण १ हजार ५३० उमेदवार बसलेले आहेत. सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली आहे.

परीक्षा काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा-सुव्यवस्था राखली जावी, यासाठी सर्व केंद्रांवर कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने उमेदवारासाठी कडक नियमावली जाहीर केली आहे. यामध्ये उमेदवार परीक्षा केंद्रावर मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अभ्यासाचे साहित्य सोबत आणू शकणार नाहीत. आयोगाच्या सूचनेनुसार उमेदवारांना जेवणाचा डब्बा, अल्पोपहार आणि पाण्याची बॉटल सोबत बाळगण्याची मुभा असेल. पहिल्या आणि दुसऱ्या पेपरच्या मधल्या वेळेत उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्रासोबत स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र आणि त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे बंधनकारक आहे. उमेदवारांना पहिल्या पेपरसाठी सकाळी ०८:३० वाजेपूर्वी, तर दुसऱ्या पेपरसाठी दुपारी ०१:३० वाजेपूर्वी परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहावे लागेल. परीक्षा सुरू झाल्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश दिला जाणार नाही, असेही प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# निमगांव (मा) रोहयोतील रस्ते गेले चोरीला पोलीसांसमोर रस्ते शोधण्याचे आव्हान

## अशोक कातखडे न्यायालयात दाद मागणार

शिरूर (का) । प्रतिनिधी

तालुक्यातील निमगांव (मा) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एम.आर.ई.जी.एस./नरेगा)अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या तीन खडीकरण रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप करण्यात आला असून, प्रत्यक्षात कामे न करता बनावट मजूर दाखवून शासन निधीचा अपहार केल्याची गंभीर तक्रार भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडाचे अध्यक्ष अशोक कातखडे यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

याबाबत दि.२५/०५/२०२६ रोजी मा.प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग,मंत्रालय मुंबई,यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून,संबंधित सरपंच, ग्रामसेवक,ग्रामरोजगार सेवक तसेच पंचायत समिती शिरूर (का) येथील जबाबदार अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांविरुद्ध उच्च स्तरीय चौकशी समिती स्थापन करून निष्पक्ष चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत,व निलंबनाची कारवाई करावी व शासन निधीची वसुली करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार निमगांव (मा) येथे ग्रामस्थ व शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने नरेगा अंतर्गत तीन खडीकरण रस्त्यांच्या कामांसाठी प्रत्येकी सुमारे २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.मात्र संबंधित कामे प्रत्यक्षात न करता खोटे मजूर दाखवून बोगस हजेरीपत्रके तयार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.



shutterstock.com · 1062792671

तक्रारीत नमूद करण्यात आलेल्या कामांमध्ये ''सरदार भाई यांचे घर ते घुंगरड यांचे शेत रस्ता खडीकरण करणे'', ''सुरेश देवकर शेत ते राम देवकर शेत रस्ता खडीकरण करणे'' तसेच ''वरंगळवाडी ते सव्वासे वस्ती ते शास्त्रीनगर रस्ता खडीकरण करणे'' या कामांचा समावेश आहे. या तिन्ही कामांमध्ये अकुशल खर्चाच्या नावाखाली बनावट मजूर दाखवून रक्कम उचलण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच कुशल खर्चाचा निधी ग्रामपंचायत खात्यात जमा असल्याचे व राज्य हिस्सा शासन स्तरावर मागणी करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.संबंधित कामांमध्ये ६०/४० चे प्रमाण अंमलात आणण्यात आले नसून सुमारे ४ लाख २६ हजार ७८९ रुपयांची बोगस उचल झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात संबंधित अधिकारी,अभियंते, कर्मचारी,सरपंच व ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवक यांनी संगनमत करून शासकीय अभिलेखांमध्ये खोटी माहिती नोंदवून शासनाची दिशाभूल केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.हे कृत्य भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे,विश्वासघात, शासकीय निधीचा अपहार तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये दंडनीय अपराध असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरील स्वतंत्र चौकशी समितीमार्फत प्रत्यक्ष स्थळ पंचनामा,मस्टर तपासणी, मजुरांचे जबाब,मोजमाप पुस्तिका,तांत्रिक मान्यता, निधी वितरण व बँक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच संबंधित दोषींविरुद्ध तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना निलंबित करण्यात यावे व अपहारित शासन रक्कम वसूल करण्यात यावी,अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान,''कामे न करताच उचलले पैसे,रोहयो नरेगा रस्ते गेले चोरीला;आता पोलीसांसमोर रस्ते शोधण्याचे आव्हान''अशी चर्चा परिसरात रंगत असून, या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडाचे अध्यक्ष अशोक कातखडे यांनी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून,कारवाईस विलंब झाल्यास न्यायालयीन लढा उभारण्याचा इशाराही दिला आहे.

# गेवराईत पोलिसांची मोठी कारवाई: दारू वाहतूक करणारी स्विफ्ट कार जप्त, ६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. नवतीस कॉँवत यांनी आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या आदेशान्वये गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी विशेष पथक तयार करून अवैध धंद्यांविरुद्ध धडक मोहीम उघडली आहे. या मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी शहरात अवैधरित्या दारूची वाहतूक करणाऱ्या एका स्विफ्ट कारसह एकूण ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सावता नगर चौकात पोलीस पथकाची कारवाई

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई शहरातून एका कारमधून देशी-विदेशी दारूची चोरटी वाहतूक होत असल्याची गुप्त



माहिती पोलीस पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने तातडीने शहरात सापळा रचला. सावता नगर चौकात संशयास्पद वाटणारी स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक: १२७९६४) थांबवून तिची झडती घेण्यात आली.

या कारवाईदरम्यान कार चालक राम अश्रुबा कदम (वय ४५ वर्षे, रा. पंचायत समिती रोड, भिमनगर, ता. गेवराई, जि. बीड) हा आपल्या कारमधून देशी व विदेशी दारूची चोरटी वाहतूक करताना रंगेहात पकडला गेला.

मुद्देमाल जप्त आणि गुन्हा दाखल

पोलिसांनी केलेल्या तपासणीत सदर कारमध्ये अंदाजे ८,००० रुपये किमतीची देशी-विदेशी दारू आढळून आली. पोलिसांनी ८,००० रुपयांची दारू आणि गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची कामगिरी

सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मा. नवतीस कॉँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तीडके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि. संतोष जंजाळ, पोह/९५४ अशोक हंबर्डे, पोकॉ/२१९८ धिरज खांडेकर, पोकॉ/१००१ महादेव कदम, पोकॉ/८१९ रामराजे काकडे आणि होमगार्ड १८५१ ढाकणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलीस प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे गेवराई परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांचे आणि वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहेत.

## पान ६ वरुन...

### कत्तलीसाठी डांबून

ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बर्दापूरचे प्रभारी अधिकारी सपोनि जगताप, पोउपनि घुले आणि पोलीस अंमलदारांच्या पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन सायगाव शिवारातील चार वेगवेगळ्या ठिकाणी छापे मारले. या छाप्यादरम्यान पोलिसांनी आखाड्यांचे मालक इमरान ताहेरबेग मिर्झा, शेख खशीम शेख इसाक, सय्यद इरफान खयामोद्दीन आणि सय्यद मुकरम जुल्फेखारअली (सर्व रा. सायगाव) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून जप्त केलेल्या जनावरांची पशुवैद्यकीय दवाखान्यात वैद्यकीय तपासणी करून पालनपोषणासाठी अंबाजोगाई येथील आशादत्त गोशाळेत रवानगी करण्यात आली आहे. या प्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या विविध कलमांन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक रमेश घुले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### नवविवाहित तलाठ्याची

आत्महत्येचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.मृत गणेश कोळी यांचा विवाह १३ मे २०२६ रोजी बीड येथील दिपाली यांच्याशी झाला होता. दिपाली या अंबाजोगाई येथील अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील फॉरेन्सिक विभागात कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. लग्नानंतर त्यांनी मोरेवाडी येथील एका घरात भाड्याने खोली घेतली होती. सोमवारी दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास, पत्नी ड्युटीवर गेलेली असताना गणेश यांनी खोलीतील लोखंडी हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. मंगळवारी शवविच्छेदनानंतर पुढील कायदेशीर कारवाई होणार असल्याचे समजते. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

### अवैध वाळू वाहतुकीवर

अज्ञात असून,संबंधित वाहना विरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राऊत तसेच पोलीस अंमलदार बाबरे,चव्हाण, राऊत व माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.

### खा. डॉ. श्रीकांत शिंदे

पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला जाणार असून पक्ष संघटन बळकट करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. विशेष म्हणजे या बैठकींसाठी शिवसेना पक्षातील विविध मंत्री व वरिष्ठ नेते देखील उपस्थित राहणार आहेत.

दौऱ्याची सुरुवात सकाळी १० वाजता केज शहरातील हॉटेल अर्जुन पॅलेस येथे होणाऱ्या केज-परळी मतदारसंघाच्या बैठकीने होणार आहे. त्यानंतर दुपारी १ वाजता हॉटेल नीलकमल येथे बीड-माजलगाव मतदारसंघाची बैठक पार पडेल तर दिवसातील शेवटची बैठक सायंकाळी ५ वाजता पाटोदा येथे आष्टी-गेवराई मतदारसंघासाठी आयोजित करण्यात आली आहे. या बैठकींमध्ये विधानसभा क्षेत्रनिहाय संघटनात्मक आढावा, तालुकानिहाय माहिती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियोजन, संभाव्य उमेदवारांबाबत चर्चा, ... नेमणुका, यादी व प्रशिक्षण नियोजन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. या बैठकींसाठी शिवसेना, महिला आघाडी, युवा सेना, अल्पसंख्यांक आघाडी, बांधकाम कामगार सेना, अध्यात्मिक आघाडी, शेतकरी सेना, ओबीसी व्ही जे एन टी सेल, डॉक्टर सेल, विधी सेल, एसटी कामगार सेना, वाहतूक सेना, शिव उद्योग सेना आणि वैद्यकीय मदत कक्ष यांसह सर्व अंगीकृत संघटनांच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी, शाखाप्रमुख, बूथप्रमुख आणि शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गळधर यांनी केले आहे.

### ऑनलाईन चक्री जुगार

सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे घेऊन ऑनलाईन चक्री नावाचा जुगार खेळवला जात आहे, अशी माहिती मिळताच पोलिसांनी दोन पंचांसमक्ष सायंकाळी ७:४० वाजताच्या सुमारास सदर ठिकाणी अचानक छापा टाकला

पोलिसांची गाडी पाहताच तिथे जुगार खेळण्यासाठी जमलेले इतर लोक अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. मात्र, पोलिसांनी एका इसमाला जागेवरच गराडा घालून ताब्यात घेतले. गणेश हरीशचंद्र लाटे (वय ३६ वर्षे, रा. बेलुरा, ता. जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो लोकांकडून पैसे घेऊन कॉम्प्युटरवर ऑनलाईन जुगार खेळत आणि खेळवत असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी आरोपी गणेश लाटे याच्या ताब्यातून कॉम्प्युटर साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण ५५ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत (जुगार कायदा) गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.सदरील धडक कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम, आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहायक फौजदार संतोष राऊत, पोलीस हवालदार शिवदास घोलप, रवींद्र राघव, ज्ञानेश्वर मराडे, आनंद गिरी, सचिन आगलावे आणि अनिल घटमळ यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

### जायकवाडीच्या पाण्यासाठी

शेतकरी आर्थिक अडचणीत येतात. यामुळे बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. यासह शेतकऱ्यांच्या मुलाचे शिक्षण आरोग्य ऊसतोड मजूर आधी प्रश्न बीड जिल्ह्यात आहेत. बीड जिल्ह्यातील हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी येथील शेती सुधारली पाहिजे. शेती सुधारण्यासाठी जायकवाडी धरण व कृष्णा खोऱ्याचे पाणी बीड जिल्ह्यातील शेतीला मिळाले पाहिजे. जिल्ह्यातील गोदावरी व सिंदफणा यासह इतर नद्या एकमेकांना जोडल्या पाहिजेत त्याचबरोबर श्रीक्षेत्र भगवानगड ते माजलगाव पर्यंत उप कालवा करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प राबविण्यात येणार असून कोकणातील पाणी गोदावरी खोऱ्यात आणले जाणार आहे. या १६८ टीएमसी पाण्यामध्ये बीड जिल्ह्याला हक्काचे पाणी मिळावे यासाठी २९ मे रोजी लोकलढा आंदोलनाच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चामध्ये बीड जिल्ह्यातील सर्व तरुण शेतकरी व्यावसायिक यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे चंकलंबा गांवच्या संरपंच सौ,प्रियकांताई खेडकर यांनी केले आहे.

# इंधन टंचाई, वीजखंडित व शेतकरी प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करा

## आ.संदीप क्षीरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना भेडसावत असलेल्या विविध मूलभूत समस्यांबाबत आज बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. संदीपभैया क्षीरसागर तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्रजी मस्के यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले.

सध्या जिल्ह्यामध्ये निर्माण झालेल्या इंधन टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, वाहनधारक तसेच अत्यावश्यक सेवांवर मोठा परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. पेट्रोल व डिझेलचा सुरळीत पुरवठा तातडीने सुरू करावा,



शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आवश्यक इंधन उपलब्ध करून द्यावे तसेच पेट्रोलपंपांवर होणारी साठेबाजी व काळाबाजार रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पावसाळ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन कृषी विभागामार्फत आवश्यक नियोजन करावे, बियाणे व खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा तसेच शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी आमदार संदीपभैया क्षीरसागर यांनी केली. तसेच रुग्णवाहिका सेवा, शासकीय आपत्कालीन यंत्रणा व आरोग्य सेवांना प्राधान्याने इंधन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून रुग्णसेवेवर कोणताही परिणाम होणार नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी बीड शहरासह ग्रामीण भागामध्ये वारंवार होत असलेल्या वीजखंडित समस्येकडेही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. उन्हाळ्याच्या तीव्र उकाड्यात नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून शेतकरी, व्यापारी व विद्यार्थ्यांनाही याचा मोठा फटका बसत आहे. त्यामुळे महावितरण विभागाने तातडीने आवश्यक उपाययोजना करून अखंड व सुरळीत विद्युत पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी केली. जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांवर प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करून तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा यावेळी आमदार संदीपभैया क्षीरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी व्यक्त केली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवसाढवळ्या दोन महिलांच्या गळ्यातील दागिने पळवले

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील नविन बसस्थानक परिसरातुन गर्दीचा फायदा घेत महिलेच्या गळ्यातील गंठण लांबवण्याची घटना २६ मे मंगळवार रोजी दुपारी घडली. तर साबळे हॉस्पिटलसमोर जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण अज्ञात चोरट्या कडून पळवण्यात आल्याची घटना २५ मे सोमवार रोजी घडली आहे. या दोन्ही घटनांमध्ये सुमारे १ लाख ७० हजार रुपयांच्या सोन्याचे दागिने चोरट्यांनी पळवले आहेत. दरम्यान शहरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून नेण्याच्या घटनेने पुन्हा डोकं वर काढल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव शहरातील नवीन बस स्थानक परिसरा पाठोपाठ इतर ठिकाणी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून नेण्याची घटना घडू लागल्या आहेत. दि.२६ मे रोजी दुपारी ३:०० वाजण्याच्या सुमारास नविन बसस्थानक परिसरात शारदा बाबु गायसमुद्रे (वय५०, शिपाई) बसची वाट पाहत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठन, ज्यामध्ये गोल आकाराचे अशोक चक्र असलेले लॉकेट काढून घेतले.तर साबळे हॉस्पिटल समोर घडलेल्या घटनेत दि.२५ रोजी संध्याकाळी ६:०० वाजता सौ.शीला पंकज साळवे या हॉस्पिटल समोरून छत्रपती संभाजी महाराज चौककडे जात असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण (अंदाजे किमंत ५० हजार रुपये.) हिसकावून पळ काढला.आशा दोन्ही घटनांमधून अज्ञात चोरट्यांनी तब्बल १ लाख ७० हजारांचे दागिने लंपास केले आहेत. वरील महिलांच्या फिर्यादीवरून अज्ञान चोरट्यांविरुद्ध माजलगाव शहर पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले होते.दरम्यान महिलांच्या गळ्यातील दागिने चोरीच्या घटनांनी डोकं वर काढल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भरदिवसा गर्दीच्या ठिकाणी महिलांना लक्ष्य करून अज्ञात चोरट्यांकडून सोन्याचे दागिने लंपास करण्यात येत असल्याने पोलिसांच्या सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# ६० लाखांच्या दरोडा प्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील अमोल ज्वेलर्सचे व्यावसायिक अमोल गायके यांच्यावर माजलगाव गडी रोडवर दिवसाढवळ्या झालेल्या सुमारे ६० लाख रुपयांच्या दरोडा प्रकरणातील आरोपीस अखेर मा.अतिरिक्त सत्र न्यायालयकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे.

दि.२५ जानेवारी २०२६ रोजी अमोल गायके हे सोन्या चांदीचे सुमारे ६० लाख रुपये किमतीचे दागिने घेऊन तालखेड येथील बाजारात विक्रीसाठी जात होते त्यावेळी एकनाथ अरुण कापाले व इतरांनी मोटरसायकल वरून त्यांचा पाठलाग करून त्यांची गाडी आडवली.आरोपींनी त्यांच्या



जीवघेणा हल्ला करून दागिन्यांची लूट केली होती,या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०/ २०२६ अन्वये बी एन एस कलम ३१०(२),३०९(४) १२६(२) तसेच भारतीय सशस्त्र कायदा कलम ४ /२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.तपासादरम्यान पोलिसांनी एकूण पाच आरोपी निष्पन्न केले होते.त्यापैकी आरोपी एकनाथ अरुण कापाले याच्या वतीने ऍड.नारायण एस.तेलगड यांनी नियमीत जामीन अर्ज दाखल केला. सदर अर्जात आरोपीच्या वकिलाने आरोपीची बाजु मांडत प्रभावी युक्तिवाद केला व केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून मा.न्यायालयाने सदर आरोपीचा नियमीत जामीन अर्ज मंजूर केला.आरोपीच्या वतीने ॲड.नारायण एस.तेलगड यांनी बाजू मांडली त्यांना ॲड.एस.के.गोंडे यांनी मार्गदर्शन केले व ॲड.डि.बी.कोरडे यांनी सहकार्य केले.

# उमेश दळवी खून प्रकरण फास्ट्रॅक्ट कोर्टात चालवून कुटुंबाचे पुनर्वसन करा -दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

उमेश नवनाथ दळवी (वय ३५) या असंघटित मजुराची काही व्यक्तींनी दि २४ मे ३०२६ रोजी सामूहिकरीत्या निर्घृण हत्या केल्याची अत्यंत संतापजनक घटना घडली असून, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.




सदर प्रकरणात खून व अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गंभीर गुन्हे दाखल आहेत. एकाला अटक देखील करण्यात आली आहे. मात्र यात आणखीन बरेच आरोपी असण्याची दाट शक्यता आहे. या घटनेचा आम्ही तीव्र निषेध व्यक्त करीत असून, संबंधित सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कसून चौकशी करण्यात यावी. तसेच मुख्यमंत्री यांच्या भूमिकेबद्दल संशय असून सदरील प्रकरणात मुख्यमंत्री बोलत नाहीत त्यांनी गृहविभागाला योग्य कार्यवाही करण्याची सूचना करावी असे आवाहन सदरील पत्रकात तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केले आहे. तसेच

सदर खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवून आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी सक्षम पुरावे सादर करण्यात यावेत. तसेच पीडित कुटुंबाला शासनामार्फत ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देऊन त्यांच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा पीडित कुटुंबास न्याय न मिळाल्यास राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, अश्या आशयाच निवेदन तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे, सोशियलमीडिया समन्वयक सुधाकर कांबळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले.

# जूनपर्यंत एल निनो सक्रीय होण्याची शक्यतां; ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाचा अंदाज

दिल्ली / वृत्तसंस्था

देशातील शेतकरी नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनची प्रतिक्षा करत असतानाच एल-निनो जूनपर्यंत सक्रीय होण्याचे संकेत ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाने दिले आहेत. त्यामुळे देशाच्या भूमीवर मॉन्सूनच्या आगमनापूर्वीच चिंता वाढली आहे.

मॉन्सूनवर परिणाम करणारे एल निनो-दक्षिणी दोलन प्रणाली (इएनएसओ) एल निनोकडे झुकण्याचा अंदाज आहे. प्रशांत महासागरातील उष्णकटिबंधीय भागात समुद्राच्या पृष्ठभागावरील तापमान झपाट्याने वाढत असून पाण्याखालील स्थितीही एल निनो तयार होण्यासाठी पोषक असल्याचे ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाने सांगितले आहे. सध्या इएनएसओ स्थिती तटस्थ असली तरी जूनपर्यंत एल निनोसाठी पोषक स्थिती निर्माण होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बहुतांश हवामान मॉडेल्स समुद्र पृष्ठभाग तापमानात सातत्याने वाढ दर्शवत आहेत. मात्र वातावरणातील सर्व संकेत अजून पूर्णपणे एल निनोशी जुळलेले नाहीत. मोसमी वारे, हवेचा दाब आणि ढगांच्या हालचाली सध्या तटस्थ स्थितीत असल्या तरी त्या एल निनोकडे झुकत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. एल निनोची तीव्रता किती असेल याबाबत अजूनही



अनिश्चितता कायम आहे. काही मॉडेल्सनुसार यंदाचा एल निनो किमान मध्यम तीव्रतेचा असू शकतो, तर मध्य प्रशांत महासागरातील तापमान वाढ अधिक राहिल्यास तीव्र एल निनोचीही शक्यताही व्यक्त केली जात आहे. भारताच्या मॉन्सून हंगामावर एल निनोचा परिणाम झाल्याचे आजवर दिसून आले आहे. मॉन्सून उशिरा आगमन, असमान वितरण किंवा पावसाचे खंड या प्रकारचे परिणाम दिसून आले आहेत. भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी मॉन्सूनचा अंदाज दिला असून, पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. तर यंदा मॉन्सून २६ मे रोजी केरळमध्ये दाखल होईल, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने यापूर्वी व्यक्त केला आहे. तसेच नुकताच मॉन्सूनचा वेग मंदावल्याचे स्पष्ट करून अरबी समुद्रात तयार होत असलेल्या संभाव्य वादळामुळे केरळ किनाऱ्यावर मॉन्सूनचे आगमन उशिरा होण्याची शक्यता वर्तवली आहे. २०२३ मध्ये जून महिन्यात एल निनो सुरू झाला आणि तो जवळपास ११ महिने कायम होता. त्यामुळे भारतातील मॉन्सूनवर परिणाम झाला. पाऊस कमी आणि अनियमित झाला. २०२४ हे वर्ष जगातील सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले. याचा फटका भात आणि कडधान्यांसारख्या पिकांना बसला. सध्या मॅडन-ज्युलियन ऑसिलेशन (एमजीओ) पश्चिम प्रशांत महासागरात सक्रिय असून जूनच्या सुरुवातीपर्यंत ते अधिक मजबूत होण्याची शक्यता आहे. यामुळे पश्चिम प्रशांत भागात पश्चिमेकडील वारे वाढू शकतात. त्यामुळे प्रशांत महासागर आणखी उष्ण होऊन एल निनोची प्रक्रिया अधिक बळकट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. इंडियन ओशन डायपोल अर्थात आयओडी सध्या तटस्थ स्थितीत आहे. आयओडी म्हणजे हिंद महासागरातील हवामान बदलाची प्रक्रिया असते. सकारात्मक स्थितीत पश्चिम हिंद महासागरात पाण्याचे तापमान वाढते, तर पूर्व भागात थंड पाणी वर येते. तर नकारात्मक स्थितीत ही प्रक्रिया उलट होते. बहुतांश मॉडेल्सनुसार हिवाळ्याच्या सुरुवातीपर्यंत आयओडी तटस्थ राहण्याची शक्यता आहे. मात्र सप्टेंबरच्या सुमारास सकारात्मक आयओडी तयार होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. २४ मे पर्यंतच्या समुद्र पृष्ठभाग तापमान विश्लेषणानुसार ऑस्ट्रेलियाभोवती बहुतांश भागात तापमान सरासरीच्या जवळ आहे. मात्र दक्षिण-पूर्व आणि दक्षिण-पश्चिम भागात समुद्राचे तापमान सरासरीपेक्षा जास्त आहे. न्यू साउथ वेल्स आणि पूर्व तस्मानिया किनाऱ्यावरील पाणी सरासरीपेक्षा ३ ते ४ अंश सेल्सिअसने अधिक उष्ण असल्याचे ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाने सांगितले आहे.

## सोयाबीन उगवण क्षमता तपासणी करण्याची पद्धत



कृषी विभागाच्या मते सोयाबीन उत्पादकांनी सोयाबीनची पेरणी करण्यापूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासून पेरणी करावी. ज्या बियाण्यांची उगवण क्षमता ही उत्तम असेल अशाच बियाण्याची पेरणी शेतकऱ्यांनी करावी जेणेकरून सोयाबीन पिकातून विक्रमी उत्पादन शेतकऱ्यांना मिळवता येईल. सोयाबीनची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. हे स्वपरागसिंचीत पीक असल्याने या पिकाचे बियाणे सरळ वाणांचे आहे. त्यामुळे दरवर्षी बियाणे बदलाची आवश्यकता नाही. मागील दोन वर्षात पेरणी केलेल्या प्रमाणित बियाण्यांपासून उत्पादीत होणारे सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी वापरल्यास उत्पादन खर्च कमी होऊ शकतो.

अशी तपासा उगवण क्षमता : तपासणी करण्याकरिता गोणपाट किंवा वर्तमानपत्राचा कागद वापरावा. एका ओळीमध्ये १.५ ते २ सें.मी. अंतरावर १० दाणे ठेवावेत. अशा प्रकारे १० ओळींमध्ये एकूण १०० दाणे व्यवस्थित रांगेत ठेवावे. त्यानंतर गोणपाटावर अथवा वर्तमानपत्रावर पाणी टाकून ओले करावेत. ते गोल गुंडाळून थंड ठिकाणी सावलीत ठेवावे. अधूनमधून त्यावर पाणी शिंपडत राहावे. सहा ते सात दिवसांनंतर कोंब आलेले दाणे वेगळे करून मोजावेत. जर उगवण झालेल्या बियाण्यांची सरासरी संख्या सत्तर किंवा त्यापेक्षा अधिक असेल, तर शिफारशीप्रमाणे ते आपल्याला पेरणीसाठी वापरता येईल. उगवण झालेल्या बियाण्याची सरासरी संख्या सत्तरपेक्षा कमी असेल, तर एकरी बियाण्याचे प्रमाण त्यानुसार वाढवून पेरणी करावी. मात्र, साठ टक्क्यांपेक्षा कमी उगवणशक्ती असणारे सोयाबीन बियाणे पेरणीसाठी वापरू नये.

## भुईमुग पिकासाठी जिप्सम वरदान; जाणून घ्या फायदे आणि वापर

भुईमुग हे महत्त्वाचे गळीत धान्य पीक आहे. या पिकामध्ये उत्पादन वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्ये म्हणजेच नत्र, स्फुरद आणि पालाश सोबतच जिप्समचा वाटा प्रमुख आहे. जिप्सममध्ये कॅल्शिअम (२४%) व गंधक (१८.६%) हे मुख्य घटक आहेत. हे दोन्ही घटक आऱ्याच्या वाढीसाठी आणि शेंगा पोसण्यासाठी उपयुक्त ठरतात.



जिप्समच्या वापराचे फायदे :जमिनीची सुपीकता वाढून ती भुसभुशीत होते. क्षारपड जमीन जिप्समच्या वापरामुळे सुधारते. बियाण्यांची उगवण क्षमता जिप्सममुळे वाढते. जिप्सममुळे पाण्यातील क्षारांचा निचरा होण्यास मदत होते. सेंद्रिय पदार्थ लवकर कुजतात. पिकाची अन्नद्रव्य शोषून घेण्याची क्षमता वाढते. फळांची, पिकांची गुणवत्ता सुधारते. भुईमुग पिकासाठी कॅल्शिअम व गंधक यांचा पुरवठा करण्यासाठी जिप्सम स्वस्त पडते. जिप्सममध्ये कॅल्शिअम (२४ टक्के) व गंधक (१८.६ टक्के) हे मुख्य घटक आहे. शेतातील प्रात्यक्षिकामध्ये जिप्समचा उपयोग केलेल्या शेतामध्ये शेंगांचे उत्पादन वाढल्याचे आढळले.जिप्सम वापर पद्धती :भुईमुगाची काढणी होईपर्यंत शेतात घातलेला जिप्सम संपतो. म्हणून दर हंगामात या पिकाला जिप्सम द्यावा लागतो. भुईमुगाच्या पेरणीपासून २५ ते ३५ दिवसांनी फुलधारणेवेळी प्रति हेक्टरी ५०० किलो जिप्सम द्यावा. जिप्समची बारीक भुकटी फूल धरण्याच्या अवस्थेत जमिनीच्या पृष्ठभागावर शक्य तितकी झाडांच्या बुंध्याजवळ पसरून द्यावी. कारण जमिनीच्या पृष्ठभागाच्या ५ सेंटिमीटर थरातील कॅल्शिअम, आऱ्या व पोसणाऱ्या शेंगांच्या उपयोगी पडतो.

वापरण्यापुर्वी सामू तपासा :जिप्समचा वापर करण्यापूर्वी माती परिक्षण करून जमिनीचा सामू किती आहे त्यानुसार जिप्समची मात्रा ठरवावी. साधारणपणे ८ पेक्षा जास्त सामू असलेल्या जमिनीमध्ये इतर खतासोबत एकरी ३०० ते ५०० किलो जिप्समचा वापर करावा.

# माहिती करून घ्या शेळ्या, मेंढ्यांमधील कोलिबॅसिलोसिस आजार

कोलिबॅसिलोसिस हा जिवाणूमुळे होणारा आजार आहे. प्रामुख्याने लहान करडे, कोकरू आणि दोन आठवड्यांपेक्षा कमी वयाच्या लहान पिल्लांना आजार होतो. तीव्र अतिसार आणि अपुरे द्रवपदार्थ सेवनामुळे जलद निर्जलीकरण होते. कोलिबॅसिलोसिस आणि विविध आजारांपासून संरक्षण होण्यासाठी नवजात पिल्लांना चीक पाजणे आवश्यक आहे. एक महिन्यापेक्षा कमी वयाच्या शेळ्या, मेंढ्यांना तीव्र अतिसार होण्याची शक्यता जास्त असते. तीव्र जुलाब होतात. या आजाराला विविध कारणे आहेत. यामध्ये प्रामुख्याने विण्याच्या कालावधीमधील प्रतिकूल हवामान परिस्थिती, लवकर दूध सोडणे, गोठ्यातील गर्दी, अस्वच्छ गोठा, कोलाई, क्लोस्ट्रिडियम कॅम्पिलोबॅक्टर किंवा साल्मोनेला जिवाणूंचे संक्रमण, क्रिप्टोस्पोरिडिया कोक्सीडिया, गिआर्डिया किंवा वर्म्स सारखे परजीवी किंवा विषाणू यांचा प्रादुर्भाव यांचा समावेश आहे.

लक्षणे : लहान करडे, कोकरांमध्ये अतिसार हे एक मृत्युदर वाढण्याचे मुख्य कारण आहे. जेव्हा मेंढ्या किंवा शेळ्यांना पोटाचे आजार होतात तेव्हा त्यांची विष्ठा मऊ पातळ आणि दुर्गंधीयुक्त बनते. कोलिबॅसिलोसिस हा जिवाणूमुळे होणारा आजार आहे. प्रामुख्याने लहान करडे, कोकरू आणि दोन आठवड्यांपेक्षा कमी वयाच्या लहान पिलांना आजार होतो. आजारी मेंढ्या आणि शेळ्यांच्या विष्ठेत कोलिबॅसिलोसिस नावाचा जिवाणू असतो. जेव्हा कोकरू/करडे या विष्ठेने दूषित अन्न किंवा पाणी खातात तेव्हा ते आजारी पडतात. सुस्त होऊन खाण्यास नकार देतात. त्यांना पातळ पांढरे-पिवळे किंवा राखाडी रंगाचे अतिसार होतात, यास पांढरे स्कॉर्स म्हणतात. संक्रमित पिलांना नाभीसंबंधीचा



दाह आणि सूज दिसून येते. तीव्र अतिसार आणि अपुरे द्रवपदार्थ सेवनामुळे जलद निर्जलीकरण होते. त्वरित उपाययोजना न केल्यास निर्जलीकरण आजाराच्या वाढीस आणि मृत्यूला कारणीभूत ठरते. घाणेरडे आणि ओलसर गोठे आजाराचा धोका वाढवू शकतात, मेंढ्या किंवा पिल्लांना वेगवेगळ्या ठिकाणी हलवणे किंवा त्यांना जास्त गर्दीमध्ये आजाराचा प्रादुर्भाव वाढू शकतो. आजारी पिल्ले निरोगी पिल्लांसोबत मिसळल्याने त्यांना कोलिबॅसिलोसिस संसर्ग होण्याची शक्यता असते.

चीक पाजणे आवश्यक : कोलिबॅसिलोसिस आणि विविध आजारांपासून संरक्षण होण्यासाठी नवजात पिल्लांना चीक पाजणे आवश्यक आहे. पिलाच्या जन्मानंतर चीक पाजला नाही तर कोलिबॅसिलोसिस होण्याची शक्यता वाढते. कारण चिकामध्ये आजार प्रतिकार क्षमता बळकट करणारे घटक असतात.

पिल्लाच्या वजनाच्या १० टक्के चीक पाजणे आवश्यक आहे. चिकाच्या अति सेवनामुळे लहान करडांना पांढऱ्या रंगाच्या जुलाब होतात. त्यामुळे करडांमध्ये मृत्युदर प्रमाण वाढते.

नवजात करडांचे व्यवस्थापन : जन्मानंतर पहिल्या २४ तासांत करडांची विशेष काळजी घ्यावी लागते. या वेळी करडांना जास्त ऊर्जेची गरज असते. तसेच नवीन वातावरणातील बदलाशी जुळवून घेणे महत्त्वाचे असते. सर्वसाधारणपणे शेळी व्यायल्यानंतर तिच्या पिलास चाटून स्वच्छ व कोरडे करते. जर असे दिसून आले नाहीतर मात्र अशा करडांना कोरड्या टॉवेलने पुसून स्वच्छ करावे. जर टॉवेल उपलब्ध नसेल तर वाळलेल्या मऊ गवताचा वापर करून करडाचे शरीर कोरडे करावे. करडांचे शरीर कोरडे करताना होणाऱ्या घर्षणामुळे श्वासोच्छ्वास व्यवस्थित होण्यास मदत होते.

मृत मेंढ्या, पिलांमध्ये आजाराची लक्षणे : जिवाणू संसर्गामुळे होणाऱ्या जळजळीमुळे आतडे नेहमीपेक्षा जास्त लाल दिसते. द्रव आणि वायू जमा होणे, विशेषत: लहान आतड्यात, आतड्यांमध्ये सूज येऊ शकते. आतड्यामध्ये राखाडी ते पिवळ्या रंगाचा द्रव असू शकतो, हे आजाराचे गंभीर लक्षण आहे. यकृत आणि मूत्रपिंडांसारख्या इतर अंतर्गत अवयवांमध्ये सूज किंवा रक्तसंचय होतो.

उपचार : अँटिबायोटिक्स कोलिबॅसिलोसिसवर प्रभावीपणे उपचार करू शकतात. आजारी कोकरू आणि पिलांना डीहायड्रेशन टाळण्यासाठी पुरेसे पिण्याचे पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स पुरवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रौढ मादी मेंढ्या आणि शेळ्या यांना विण्याच्या अगोदर ६-८ आठवड्यांपूर्वी लसीकरण करावे. जेणेकरून त्यांच्या पिलांना कोलिबॅसिलोसिस आणि इतर विविध आजारांपासून संरक्षण मिळेल. लहान पिलांना स्वतंत्र कोरडा स्वच्छ गोठ्यात ठेवावे. लहान पिल्लांना मोठ्या वयाच्या शेळ्या, मेंढ्यांच्या सोबत ठेवू नये.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९० : मलिक अहमद या जुन्नर येथील बहामनी सेनापतीने उर्वरित बहामनी सैन्याचा पराभव करून जुन्नर येथे स्वतंत्र सल्तनतीची घोषणा केली.

१५०३ : पोप अलेक्झांडर सहाव्याच्या फतव्यानुसार स्कॉटलँडचा राजा जेम्स चौथा व मार्गरिट ट्युडोरचे लग्न झाले.

१५८८ : एकशे तीस युद्धनौकांवर ३०,००० सैनिकांसह स्पॅनिश आर्माडा इंग्लंडवर चाल करायला निघाला.

१७७४ : अमेरिकन क्रांती पहिल्या कॉन्टिनेन्टल काँग्रेसला सुरुवात.

१८३० : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष अँड्र्यू जॅक्सनने इंडियन रिमुव्हल ऍक्टवर सही करून स्थानिक अमेरिकन जमातींना स्थलांतर करण्यास भाग पाडले.

१८९२ : जॉन मुइरने सान फ्रांसिस्कोमध्ये सियेरा क्लबची स्थापना केली.

१९०५ : रशिया-जपान युद्ध-त्सुशिमाची लढाई जपानी दर्यासारंग टोगो हेहाचिरोने रशियाचे आरमार बुडवले व लढाई संपवली.

१९०७ : पहिली आइल ऑफ मॅन टीटी रेस आयोजित करण्यात आली.

१९१८ : अझरबैजानने स्वत:ला स्वतंत्र घोषित केले.

१९३६ : ऍलन ट्युरिंगने ऑन कम्युटेबल नंबर्स हा शोधनिबंध प्रकाशित केला.

१९३७ : फ्रँकलिन डिलानो रूझवेल्टने वॉशिंग्टन डी.सी.मध्ये बटन दाबून सान फ्रांसिस्कोमधील गोल्डन गेट ब्रिज वाहतूकीला खुला केला.

१९३७ : नेव्हिल चेंबरलेन युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानपदी.

१९४० : दुसरे महायुद्ध बेल्जियमने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.

१९५२ : ग्रीसमधे स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.

१९५८ : ७५ व्या वाढदिवसानिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा मुंबई महापालिकेतर्फे सत्कार करण्यात आला.

१९५९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने दोन अमेरिकन माकडांना अंतराळ यात्रा घडवून आणली.

१९६४ : पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन () ची स्थापना झाली.

१९७० : ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस पक्षाचे औपचारिकपणे विभाजन करण्यात आले.

१९९६ : भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा राजीनामा

१९९८ : भारताने केलेल्या अणुचाचणीला उत्तर म्हणून पाकिस्तानने पाच अणुबॉम्ब उडवले.

१९९९ : इटली मध्ये लिओनार्डो दा विंची यांचे द लास्ट सपर हे चित्र प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले.

२००४ : अयाद अल्लावी इराकच्या पंतप्रधानपदी.

२००८ : साली नेपाल मध्ये पुरातन काळापासून चालत आलेली राजशाही परंपरेचा अंत करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५२४ : सलीम दुसरा, ऑट्टोमन सम्राट.

१६६० : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७२७)

१७३८ : जोसेफ-इग्नास गिलोटिन, फ्रांसचा डॉक्टर.

१७५९ : छोटा विल्यम पिट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.

१८८३ : क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९६६)

१९०३ : उद्योगपती, किर्लोस्कर उद्योगसमूहाचे आधारस्तंभ शंतनुराव किर्लोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २४ एप्रिल १९९४)

१९०७ : स्वातंत्र्यसेनानी रायगड मिलिटरी स्कूलचे संस्थापक दिगंबर विनायक तथा नानासाहेब पुरोहित यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९९४)

१९०८ : दुसर्या महायुध्दातील गुप्तहेर, लेखक, पत्रकार आणि जेम्स बाँड चा जनक इयान फ्लेमिंग यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९६४)

१९२१ : शास्त्रीय गायक पं. दत्तात्रय विष्णू ऊर्फ बापूराव पलुसकर यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑक्टोबर १९५५)

१९२३ : तेलगू अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व आंध्रप्रदेशचे १० वे मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९९६)

१९२५ : ब्युलेंट एसेव्हिट, तुर्कस्तानचा पंतप्रधान.

१९४६ : भारतीय कवी आणि समीक्षक के. सच्चिदानंदन यांचा जन्म.

१९४८ : प्रख्यात भारतीय मल्याळम आणि इंग्रजी भाषिक कवी आणि समीक्षक तसचं, मल्याळ भाषेतील आधुनिक काव्याचे प्रणेते, द्वैभाषिक साहित्य समीक्षक, नाटककार, संपादक, स्तंभलेखक आणि अनुवादक, भारतीय साहित्य जर्नलचे माजी संपादक आणि साहित्य अकादमीचे माजी सचिव के. सच्चिदानंदन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८७ : ऑस्ट्रियन संगीतकार व व्हायोलिनवादक लिओपोल्ड मोत्झार्ट यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १७१९)

१९६१ : प. कृ. गोडे, प्राच्यविद्या संशोधक.

१९७९ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय चिकित्सक (डॉक्टर), शिक्षणतज्ज्ञ, बँकर आणि समाजसेवक डॉ. टोन्से माधव अनंत पाई यांचे निधन.

१९८२ : बळवंत दामोदर ऊर्फ कित्तेवाले निजामपूरकर यांचे निधन.

१९९४ : हिंदूसभेचे नेते व पुण्याचे महापौर गणपतराव नलावडे यांचे निधन.

१९९९ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते बी. विट्टालाचारी यांचे निधन. (जन्म: १८ जानेवारी १९२०)

गुरूवार दि.२८ मे २०२६ ५
राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# संघर्ष, संघटन आणि निष्ठेच्या बळावर कर्जतकर विधानपरिषदेत - सभापती राम शिंदे



जामखेड । प्रतिनिधी

''आणीबाणीच्या काळातील संघर्षातून झालेली वैचारिक जडणघडण आणि पक्षनिष्ठेच्या बळावर नान्नजच्या मातीतून सुरू झालेला प्रवास आज विधानपरिषदेच्या सभागृहापर्यंत पोहोचला आहे,'' असे गौरवोद्गार विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी काढले. नुकतेच विधानपरिषदेवर बिनविरोध निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार सुनिल कर्जतकर यांचा नागरी सत्कार सोहळा जामखेड तालुक्यातील नान्नज येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर उत्साहात पार पडला. यावेळी प्रा. राम शिंदे बोलत होते.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य दत्ता वारे, माजी पंचायत समिती सभापती भगवान मुरूमकर, रवी सुरवसे, तालुकाध्यक्ष बापूराव ढवळे, जिल्हा कोषाध्यक्ष अजिनाथ हजारे, जवळा गावाचे सरपंच सुशील आव्हाड, जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, अमित चिंतामणी, सभापती शरद कार्ले, मनोज कुलकर्णी, प्रविण सानप,जालिंदर चव्हाण, नान्नजचे सरपंच महेंद्र मोहोळकर, सुनील हजारे, संतोष मोहोळकर, सवता मोहोळकर, उदय पवार, आदी मान्यवर उपस्थित होते. शिंदे म्हणाले, १९७५ च्या आणीबाणीच्या काळात कै. प्रमोद महाजन आणि कै. गोपीनाथ मुंडे यांच्या सहवासातून सुनिल कर्जतकर यांची वैचारिक जडणघडण झाली. त्यानंतर १९८० मध्ये अवघ्या २२ व्या वर्षी भाजपचा झेंडा हाती घेत त्यांनी नान्नज येथे पक्षाची पहिली शाखा स्थापन केली. पक्ष संघटनेसाठी त्यांनी चार दशकांहून अधिक काळ सातत्याने काम केले असून, त्याचेच फलित म्हणजे आज त्यांची विधानपरिषदेवर निवड झाली आहे. पुढे बोलताना त्यांनी कर्जतकर यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक केले. महाराष्ट्रासह गुजरात आणि गोवा विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाने त्यांच्यावर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. गुजरातमधील राजकोट जिल्ह्याची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे सांभाळली. तसेच गोवा विधानसभा निवडणुकीतही त्यांनी शिस्तबद्ध नियोजनातून पक्ष संघटना मजबूत करण्याचे काम केले, असे शिंदे यांनी सांगितले.

''भाजपच्या विचारांवर आणि कार्यकर्त्यांच्या ताकदीवर माझा नेहमीच विश्वास राहिला आहे. पक्षाने सामान्य कार्यकर्त्याला दिलेला हा सन्मान असून, ही जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडेन. नान्नजसह कर्जत-जामखेड मतदारसंघातील ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न विधानपरिषदेत प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रयत्नशील राहीन,''

– नवनिर्वाचित आमदार सुनिल कर्जतकर .

# गोमातेला राष्ट्रीय पशुचा दर्जा देण्याची हिंदू- मुस्लिम बांधवांची आदर्श मागणी

पाथर्डी। प्रतिनिधी

गोमातेला शासनाने राष्ट्रीय पशु चा दर्जा देऊन गोहत्या बंदी कायदा अमलात आणावा गाय विकणारे विकत घेणारे वाहतूक करणारे अशा सर्वच घटकांवर कारवाई व्हावी अशा संदर्भाचा ठराव तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी केला या निर्णयाचे सर्व धर्मीय नागरिकांकडून जोरदार स्वागत झाले प्रांतअधिकारी प्रसाद मते तहसीलदार डॉ.उद्धव नाईक पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना निवेदन देण्यात आले या शिष्टमंडळामध्ये काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नासिर शेख जुनेद पठाण सामाजिक कार्यकर्ते शनो पठाण मुन्ना खलिफा एजाज शेख आरिफ कुरेशी समीर शेख असिफ शेख इष्टियाक चौधरी उस्मान शेख मोहम्मद पटेल अजीज शेख सुनील दौंड सरफराज चौधरी आनंद सानप अमजद आतार वसीम मणियार जावेद पिंजारी अकबर शेख सादिक सय्यद आदींनी निवेदन दिले यावेळी माहिती देताना नासिर शेख म्हणाले गोमाता म्हणजे गाय सर्व जाती धर्माच्या नागरिकांचे श्रद्धेचे स्थान आहे गाईला राष्ट्रीय पशुचा दर्जा दावा यासाठी आम्ही गेल्या अनेक दिवसांपासून या संदर्भात मागणी करत आहोत सर्व भारतीयांना गाई विषयी आदर वाटतो केंद्राने याबाबतचा कायदाच करण्याची गरज आहे संदर्भात निष्पाप नागरिकांवर दाखल होणारे खोटे गुन्हे सुद्धा दाखल करू नये निरपराध लोकांना त्रास होत असेल तर याचा परिणाम तणाव वाढण्यात होतो गाय विकणारे खरेदी करणारे वाहतूक करणारे असे सर्वच जण कारवाईला पात्र ठरले पाहिजेत सामाजिक शांतता जातीय सलोखा भंग पावणार नाही याचीही दक्षता प्रशासनाने घेतली पाहिजे या गैरकृत्याला केवळ एका समाजाला जबाबदार धरून चालणार नाही सामाजिक शांतता व जातीय सलोखा टिकून ठेवण्यासाठी मुस्लिम समाज नेहमीच सकारात्मक राहिला आहे देश सध्या वेगळ्या संकटातून जात आहे शासन प्रशासन प्रचंड तणावग्रस्त मनस्थितीत वावरत आहे देशातील जनता सुद्धा मोठ्या प्रमाणावर संकटात आहे अशावेळी जातिवाद धर्मवाद व त्यावरून होणारी भांडणे सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने परवडणारी नाहीत गोहत्या संदर्भात संदर्भात एकाच समाजाकडे संशयाने बघणे चुकीचे आहे सर्व राष्ट्राचीच पवित्र माता म्हणून गोमातेकडे संपूर्ण देश बघतो त्यामुळे राष्ट्रीय पशुचा दर्जा द्या दोषींवर कारवाई करताना निरपराध व्यक्तीला अशा प्रकरणांमध्ये ओढू नका अशी मागणी मुस्लिम बांधवांनी केल्याची माहिती नाशिर शेख यांनी दिली.

# बकरी ईदच्या कत्तलीकरीता आणलेले २० बैलाची आरोपीकडुन सुटका ;कदीम पोलीसांची कारवाई



जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील मोरंडी मोहल्ला येथील मुजम्मील व गफार कुरेशी यांच्या वाड्यात गोवंशीय जनावरे निर्दयतेने वाड्यात कोंबुन विनापरवाना कत्तलीकरीता डांबुन ठेवले आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्यावरुन पोनि श्री. जनार्धन शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली रात्री ०१.३० वाजताचे सुमारास कदीम जालना पोलीस ठाण्याकडील पोलीस पथकांनी दोन पंचासोबत मोरंडी मोहल्ला जुना जालना या ठिकाणी जावुन छापा टाकला असता तेथे ०७ गो-हे व ११ बैल असे एकुण २० गोवंशीय जनावरे मिळुन आले आहेत. १,७५,०००/-रुपये किंमतीचे एकुण ०७ लाल पांढ-या काळया रंगाचे गो-हे त्यास उभट शिंगे असलेले मध्यमआकाराचे गो-हे प्रत्येकी किंमत २५,०००/- रुपये प्रमाणे किं. अंदाजे २)५,२०,०००/- रुपये किंमतीचे एकुण १३ लाल पांढ-या व काळ्या रंगाचे उभट शिंगे असलेले बैल, प्रत्येकी किंमत ४०,०००/- रुपये प्रमाणे किं. अंदाजे ६,९५,०००/- एकूण जप्त मुद्येमाल आरोपी शेख जुबेर शेख फिरोज रा. मोरंडी मोहल्ला जुना जालना ,ग्यासोददीन कमरोददीन कुरेशी रा. मोरंडी मोहल्ला जुना जालना छापा कारवाई पथक सदरची कारवाई मा.श्री. तेघबीर सिंह संधू, पोलीस अधीक्षक जालना, मा.श्री. विक्रम साळी, अप्पर पोलीस अधीक्षक जालना, मा.श्री. अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.जे.बी.शेवाळे, पोलीस निरीक्षक, कदीम जालना पोलीस ठाणे, सपोनि श्री. अविनाश गडाख, जिल्हा नियंत्रण कक्ष जालना, सपोनि श्री. अमित मस्के, सफौ/बरडे, सफी/खरात, पोहेकॉ कोकणे, पोहेकॉ सदा राठोड, पोहेकॉ/उरफाटे, पोना/बाबा गायकवाड, पोना/ताहेर शेख, पोकों/सदाशीव मुटकुळे सर्व नेमणुक कदीम जालना पोलीस ठाणे यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास मपोहेको / प्रतिभा पंडुरे हे करीत आहे.

# विधानपरिषद मतदारसंघ भाजपलाच देण्यात यावे

## दानवे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी



जालना। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद मतदारसंघाची जागा भारतीय जनता पक्षाला सोडण्यात यावी, अशी मागणी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी आज मंगळवार दि. २६ मे रोजी मुंबई येथे शिष्टमंडळासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन केली. शिष्टमंडळामध्ये जालना जिल्ह्यातील आ.नारायण कुचे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर आदींची उपस्थिती होती. तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मा.ना.अतुलजी सावे, आ.प्रशांत बंब, माजी आमदार संजय केनेकर, मंगरुळे आप्पा, बापू घडामोडे, इत्यादींची उपस्थिती होती.

यावेळी शिष्टमंडळातील सर्व मान्यवरांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या भेटी दरम्यान सांगितले की, छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक ताकद, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रभाव आणि कार्यकर्त्यांचे मोठे जाळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतील मतदारांची संख्या लक्षात घेता ही जागा भाजपलाच देण्यात यावी, अशी मागणी केली. तसेच या मतदारसंघात भाजपचा उमेदवार विजयी करण्यासाठी कार्यकर्ते पूर्ण ताकदीने काम करतील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून भाजपा कार्यकर्त्यांनी ग्रामीण तसेच शहरी भागात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपची ताकद वाढली आहे. त्यामुळे आगामी विधानपरिषद निवडणुकीत भाजपला संधी मिळणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सकारात्मक चर्चा केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या भेटीमुळे जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३००
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :-१२/०५/२०२६

नांव बदलण्याचा
जाहिरनामा

अर्जदार श्री. सौ. श्रीमती शेख साजेद शेख गालेब
प्रकरण : सिटि सर्वे नं १७०७ मधील नं प घर नं १५-८० चे हस्तातरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१५-८०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जायेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा, नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व :- खाजगी बोळ
पश्चिम :- आटोळे यांचे घर
दक्षिण :- रस्ता
उत्तर :- खजामिया यांचे घर

स्वाक्षरित
मुख्याधिकारी नगर परिषद, अंबड

# मानसिक शांततेसाठी भागवतातील विचार एकमेव मार्ग-वेदांत महाराज



जालना। प्रतिनिधी

श्रीमद्? भागवत महापुराण हा केवळ एक ग्रंथ नसून तो साक्षात भगवान श्रीकृष्णांचे वाङ्मयीन स्वरूप आहे. आजच्या गतिमान आणि धावपळीच्या युगात मानवी मनाला परम शांती मिळवून देण्याचे सामर्थ्य केवळ हरिनाम स्मरणातच आहे, असे उद्गार श्री धाम वृंदावन येथील सुप्रसिद्ध भागवताचार्य वेदांत महाराज जोशी यांनी काढले.

पंच परिवाराच्यावतीने शहरातील बिहारीलालनगर येथील 'शांती सदन' मध्ये आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय भव्य श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची रविवार दि. २४ मे रोजी महापूर्णाहुतीने सांगता झाली. या सोहळ्यात संपूर्ण जालना शहरासह जिल्ह्यातील हजारो भाविकांनी हजेरी लावून कथा श्रवणाचा अलौकिक आनंद घेतला. दररोज दुपारी २.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शांती सदनचा संपूर्ण परिसर 'हरे कृष्ण' आणि विठ्ठल नामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. कथेच्या अंतिम दिवशी निरूपण करताना वेदांत महाराज पुढे म्हणाले की, जालन्यातील पंच परिवाराने ज्या अपार श्रद्धेने व निष्ठेने हा ज्ञानयज्ञ यशस्वी केला, ते खरोखरच कौतुकास्पद आहे.

हा भक्तीभाव समाजात शांतता आणि समृद्धीची नवी चेतना निर्माण करेल, असे ते म्हणाले. भक्त सुदामा चरित्र, श्री कृष्ण-सुदामा भेट, राजा परीक्षित मोक्ष आणि भागवत सार या प्रसंगाचे अत्यंत भावस्पर्शी व मार्मिक निरूपण करण्यात आले. शुकदेव जींच्या निरोप प्रसंगी आणि पूर्णाहुतीच्या वेळी अनेक भाविकांचे डोळे पाणावले होते. वेदांत महाराज जोशी यांनी आपल्या ओजस्वी आणि सुमधुर वाणीने सातही दिवस संगीतबद्ध कथेचे रसपान घडवले. सोमवार १८ मे रोजी दधीमती माता मंदिर ते शांती सदन अशी काढण्यात आलेली भव्य कलश यात्रा संपूर्ण शहरात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

पहिल्या दिवशी भागवत महात्म्य, शुकदेव आगमन, राजा परीक्षित कथा, वराह अवतार आणि कपिल मुनी-देवहुती संवाद, दुसऱ्या दिवशी ब्रह्मांड निर्मितीचे तात्विक विवेचन, परमभक्त बालक ध्रुवाची अढळ तपश्चर्या, जडभरत प्रसंग आणि ऋषभदेव चरित्र, तिसऱ्या दिवशी भक्त प्रल्हादाची दृढ भक्ती, नृसिंह अवताराद्वारे हिरण्यकश्यपूचा वध, गजेंद्र मोक्ष कथा, देव-असुर समुद्र मंथन आणि राजा बळीचा अहंकार दूर करणारी वामन अवतार कथा, चौथ्या दिवशी सूर्यवंश आणि चंद्रवंशाचे सविस्तर वर्णन, मर्यादा पुरुषोत्तम श्री राम कथा आणि मुख्य प्रसंग म्हणून भगवान श्री कृष्ण अवतार व भव्य नंदोत्सव, पाचव्या दिवशी श्री कृष्णाची माखन चोरी, पूतना वध, कालिया मर्दन यांसारख्या अनुपम बाललीला. मुख्य आकर्षण म्हणून गोवर्धन पूजा आणि छप्पन भोग उत्सव, सहाव्या दिवशी गोपींसोबतचे वेणू गीत आणि महारास लीलेचे आध्यात्मिक रहस्य, दुराचारी कंसाचा वध, उद्धव-गोपी संवाद आणि मुख्य प्रसंग म्हणून भव्य श्री कृष्ण-रुक्मिणी विवाह सोहळा, सातव्या आणि शेवटच्या दिवशी समारोपप्रसंगी परम मित्र भक्त सुदामाची दिनता आणि कृष्ण-सुदामा यांची अलौकिक गळाभेट, राजा परीक्षित यांचा मोक्ष, शुकदेवजींचा निरोप, भागवत सार आणि महापूर्णाहुती झाली. कथा समाप्तीनंतर जालना येथील अजंठा नगर भागातील राज मंगल कार्यालय येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी पंच परिवारातील सदस्य आणि बिहारीलाल नगरमधील रहिवाशांनी विशेष परिश्रम घेतले.

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि. बीड
एम ए जी विभाग
ई मेल-kaijtahsildar@gmail.com
दुरध्वनी क्र. ०२२४५-२५२६४५
क्रं.२०२६/एमएजी/कावि/९९०
दिनांक:- ८.५.२०२६

जाहीरनामा

सर्व जनता मौजे बनकरंजा ता. केज यांना जाहीर केले जाते की, बनकरंजा येथील जन्म पावलेली इसम नामे नागरगोजे छाया विठठलराव हिचा जन्म दिनांक-०९/०३/१९९१ रोजी मौजे बनकरंजा ता. केज येथे झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्रामपंचायत अधिकारी ग्राम पंचायत बनकरंजा यांना देणे बाबत त्यांचा वडील नामे नागरगोजे विठठल मारुती रा. बनकरंजा ता. केज जि. बीड यांनी या कार्यालयास दि.३१.१०.२०२५ रोजी अर्ज व शथपत्र सादर करुन सोबत ग्राम पंचायत बनकरंजा यांचे जन्म नोंद नसल्याचे प्रमाण पत्र, नोटरी करुन शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत बनकरंजा ता. केज यांना त्यांच्या मुलीचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- नागरगोजे छाया विठठलराव हिचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय बनकरंजा ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित
कार्यकारी दंडाधिकारी,
केज करिता

# ऑनलाइन अभ्यासाच्या जोरावर दीपक नांदोडेची आयआयटी कानपूरमध्ये झेप

## अर्थशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित



मंठा। प्रतिनिधी

जिद्द, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थ्यांनी यशाची नवी शिखरे गाठल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यातच अहिल्यानगर येथे विज्ञान शाखेतील सांख्यिकी विषयाच्या तृतीय वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या दीपक मनोज नांदोडे याने ऑनलाइन अभ्यासाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत भारतीय तंत्रज्ञान संस्था कानपूर येथे अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित केला आहे. दीपक नांदोडे याने तृतीय वर्षात असतानाच आयआयटी जॅम २०२६ परीक्षेची तयारी सुरू केली होती. तयारीसाठी त्याने 'मॅथस्टॅट्स क्लास' या ऑनलाइन मार्गदर्शन संस्थेत प्रवेश घेतला. संस्थेकडून मिळालेले योग्य मार्गदर्शन, अभ्यासाचे नियोजन आणि मित्रांकडून मिळालेली प्रेरणा यामुळे त्याची तयारी अधिक सक्षम झाली.सुमारे सात ते आठ महिने सातत्यपूर्ण व मनापासून अभ्यास करून दीपकने आयआयटी जॅम २०२६ परीक्षेला सामोरे गेले. दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या या परीक्षेचा निकाल १९ मार्च २०२६ रोजी जाहीर झाला. या परीक्षेत त्याने अखिल भारतीय क्रमांक १६८ मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

यानंतर दिनांक २५ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या पहिल्या प्रवेश यादीत दीपकची भारतीय तंत्रज्ञान संस्था कानपूर येथे अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली. विशेष म्हणजे कोणत्याही प्रत्यक्ष वर्गांना उपस्थित न राहता केवळ ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करून त्याने हे यश मिळवले आहे.

दीपक हा 'दैनिक सकाळ'चे मंठा तालुका प्रतिनिधी कृष्णा भावसार यांचा नातू असून त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशाबद्दल बोलताना दीपकने आपल्या शिक्षकांचे, आई अनिता नांदोडे, वडील मनोज नांदोडे, मार्गदर्शक, ऑनलाइन मार्गदर्शन संस्था तसेच सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. ''योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वास यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते,'' अशी भावना त्याने व्यक्त केली. ''यश मिळवण्यासाठी महागडे क्लासेस किंवा मोठ्या शहरांची गरज नसते, तर गरज असते ती जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्वतःवर असलेल्या विश्वासाची. मी केवळ ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करत आयआयटी जॅम २०२६ परीक्षेत अखिल भारतीय १६८ वा क्रमांक मिळवला. अनेक विद्यार्थी लाखो रुपये खर्च करूनही अपेक्षित यश मिळवू शकत नाहीत; मात्र योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि प्रामाणिक परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही ध्येय। गाठता येते, हे मी सिद्ध करून दाखवले.माझ्या या प्रवासात आई-वडील, शिक्षक, मार्गदर्शक, ऑनलाइन मार्गदर्शन संस्था आणि मित्रांनी दिलेली साथ हीच माझी खरी ताकद ठरली.

# दिल्ली येथील पथकाकडून जालना जिल्ह्यातील जनगणनेच्या कामकाजाचे कौतुक




जालना। प्रतिनिधी

जनगणना २०२७ अंतर्गत दि. १६ मे ते १४ जून, २०२६ या कालावधीत महाराष्ट्रात घरसूचीकरण व घरगणना यादी कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाची पाहणी करण्यासाठी दिल्ली येथील केंद्र शासनाच्या जनगणना कार्यालयाचे अतिरिक्त महानिबंधक संजीव कुमार, आणि उपसंचालक संदिप राय हे (दि. २६ मे) आजरोजी जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता, त्यांनी जालना तालुक्यातील मौजे धारकल्याण, बदनापूर नगर पंचायत, बदनापूर तालुक्यातील मौजे शेलगाव, तसेच जालना शहर महानगर पालिकेच्या हद्दीतील जांगडानगर (ढवळेश्वर) येथे प्रत्यक्ष भेटी देऊन सुरु असलेल्या जनगणनेच्या कामकाजाचा आढावा घेतला.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे स्थापन करण्यात आलेल्या जनगणना कक्षास भेट देऊन सर्व अधिकारी /कर्मचारी यांची बैठक घेवून जनगणनेच्या कामाबाबत महत्वाच्या सूचना देत मार्गदर्शन केले. जिल्ह्याच्या प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सुरु असलेल्या जनगणनेच्या कामकाजाबाबत दिल्ली येथील पथकाने कौतुक करून समाधान व्यक्त केले.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

गुरूवार दि.२८ मे २०२६ ६

# उल्हासभैय्या गिराम

## निष्ठा, संघर्ष आणि नेतृत्त्वाचा 'उल्हास'



बीड जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात जेव्हा जेव्हा निष्ठा आणि संघर्ष हे शब्द निघतात, तेव्हा एक चेहरा सर्वात आधी डोळ्यांसमोर येतो-तो म्हणजे उल्हासभैय्या गिराम. स्वर्गीय हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सुरू झालेला त्यांचा शिवसैनिक ते आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे 'बीड जिल्हाप्रमुख' हा प्रवास म्हणजे केवळ एका पदाचा प्रवास नाही, तर एका अखंड ध्येयवादाची गाथा आहे. उद्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त, त्यांच्या या झंझावाती आणि प्रेरणादायी कार्याचा घेतलेला एक विशेष आढावा:



### बाळासाहेबांचे 'लढाऊ' सैनिक ते जिल्हाप्रमुख

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा मंत्र उराशी बाळगून उल्हासभैय्यांनी तरुण वयातच हातात भगवा घेतला. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या धगधगत्या विचारांचे बाळकडू घेतलेले उल्हासभैय्या, पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे आणि युवा नेते आदित्यजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड जिल्ह्यात पक्षाचा मुख्य कणा बनले आहेत. पक्षातील चढ-उतार, फुटीचे राजकारण आणि कठीण प्रसंगातही न डगमगता, त्यांनी आपली निष्ठा ढळू दिली नाही. याच निष्ठेची दखल घेत पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी त्यांच्या खांद्यावर बीड जिल्हाप्रमुख पदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली.



### बीड ते मुंबई 'पदयात्रा': नेतृत्त्वाचा नवा इतिहास

उल्हासभैय्या गिराम यांच्या नेतृत्त्वाची खरी ताकद तेव्हा दिसली, जेव्हा त्यांनी बीड जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी बीड ते मुंबई अशी ऐतिहासिक पदयात्रा काढली. शेकडो मैलांचे अंतर पायी पार करत त्यांनी शिवसैनिकांची वज्रमूठ बांधली. पायाला फोड आले, पण पक्षाप्रती असलेली निष्ठा आणि जिद्द कमी झाली नाही. या पदयात्रेने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आणि बीड जिल्ह्यातील शिवसेना पुन्हा एकदा दिमाखाने उभी राहिली.



सामाजिक बांधिलकी आणि जनसंवाद

उल्हासभैय्यांचे राजकारण हे केवळ निवडणुकांपुरते मर्यादित नाही. त्यांचे समाजकारण वर्षभर अविरत सुरू असते. त्यांच्या सामाजिक कार्याचे प्रमुख पैलू खालीलप्रमाणे आहेत:

**रक्तदान शिबिरे:** आरोग्य क्षेत्रात नेहमीच तत्पर राहत त्यांनी अनेक भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करून हजारो गरजू रुग्णांना मदत मिळवून दिली आहे.

**वृक्षारोपण आणि पर्यावरण:** पर्यावरण रक्षणाचा ध्यास घेत त्यांनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहिमा राबवल्या आहेत आणि केवळ झाडे लावली नाहीत, तर ती जगवली सुद्धा.

**कोरोना काळातील कार्य:** आपत्तीच्या काळात सर्वसामान्य जनतेला अन्नधान्य, औषधे आणि बेड मिळवून देण्यासाठी ते स्वतः रस्त्यावर उतरून काम करत होते.

**सर्वसमावेशक स्वभाव आणि कार्यकर्त्यांचे पाठबळ**

उल्हासभैय्या यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा सर्वसमावेशक आणि मैत्रीपूर्ण स्वभाव. पद येतो आणि जातो, पण कमावलेली माणसं कायम सोबत राहतात, या विचाराने ते जगतात. त्यांच्याकडे येणारा प्रत्येक कार्यकर्ता किंवा सामान्य नागरिक कधीही रिकाम्या हाताने परत जात नाही. ज्येष्ठांचा आदर आणि तरुणांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची हातोटी यामुळेच आज बीड जिल्ह्यातील तरुण वर्ग मोठ्या संख्येने त्यांच्याशी जोडला गेला आहे.

**आगामी वाटचाल आणि संकल्प**

आज बीड जिल्ह्यात पक्ष वाढीसाठी ते अहोरात्र कष्ट घेत आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि सर्व निवडणुकांमध्ये भगवा फडकवण्यासाठी त्यांनी तालुकानिहाय दौरे करून संघटन मजबूत केले आहे. ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत प्रत्येक शिवसैनिकाच्या मनात त्यांनी विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे.

**नगरपालिकेत इंट्री**

नुकत्याच झालेल्या बीड नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सामाजिक कार्याचा फायदा उल्हास गिराम पाटील यांना झाला. त्यांच्या पत्नी या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या. शिवसैनिकांचे परिश्रम आणि जिल्हाप्रमुखांचे मार्गदर्शक यामुळे ते यश प्राप्त झाले.

**नेहमी मदतीला धावून जाणारे जिल्हाप्रमुख**

बीड जिल्हा प्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पूर्वीप्रमाणेच त्यांनी सामाजिक कार्य चालू ठेवले आपण जिल्हाप्रमुख आहोत हा गर्व त्यांना कधीच नव्हता आणि नाही एक शिवसैनिक म्हणून प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणे हा त्यांचा स्वभाव असल्यामुळे मित्र कंपनीची संख्या मोठ्या प्रमाणात आहे आज त्यांच्याकडे आष्टी पाटोदा शिरूर या मतदारसंघाचा पदभार असला तरी जिल्ह्यातील प्रत्येक शिवसैनिक त्यांच्यासाठी मोलाचा असतो शिवसेनेकी नव्हते अन्न कोणालाही कधीही अडचण असेल तर फोन केला की धावून जाणारे व्यक्तिमत्व म्हणून उल्हास भैय्या यांचे नाव घेतले जाते

**वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!**

आपल्या कर्तृत्वाने बीड जिल्ह्याच्या राजकारणात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या, संघर्षातून नेतृत्व सिद्ध करणाऱ्या आणि निष्ठेचे दुसरे नाव असलेल्या आदरणीय उल्हासभैय्या गिराम यांना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या नेतृत्त्वात पक्षाची घोडदौड अशीच सुरू राहो, हीच आई भवानी चरणी प्रार्थना!

**– शब्दंकन : आपल्या सर्व स्नेही, मित्रपरिवार आणि बीड जिल्हा शिवसेना**

## कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या १९ गोवंशीय जनावरांची सुटका

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव शिवारात वेगवेगळ्या चार आखाड्यांवर पोलिसांनी धडक छापे टाकून कत्तलीच्या उद्देशाने निर्दयतेने डांबून ठेवलेली तब्बल १९ गोवंशी जनावरे जप्त केली आहेत. या कारवाईत गायी, बैल आणि गोऱ्हे यांसह एकूण ४ लाख रुपये किमतीच्या पशुधनाची सुटका करण्यात आली असून चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस ठाणे बर्दापूर येथील सायगाव बीटचे अंमलदार शरद कदम यांनी या प्रकरणी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. बर्दापूर पोलिसांना सायगाव शिवारातील



वेगवेगळ्या आखाड्यांवर गोवंशी जनावरे कत्तलीसाठी आणून पत्राच्या शेडमध्ये उपाशीपोटी बांधून ठेवल्याची गुप्त माहिती मिळाली होती. सहाय्यक पोलीस अधीक्षक ◀◀ पान ३ वर

## नवविवाहित तलाठ्याची गळफास घेऊन आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहराजवळच असलेल्या मोरेवाडी परिसरात सोमवार दि. २५ मे रोजी नवविवाहित तरुणाने भाड्याच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. गणेश दत्तू कोळी (वय अंदाजे वर्षे, मूळ रा. नांदुर्गा, ता. औसा) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते चंद्रपूर महसूल विभागात तलाठी पदावर कार्यरत होते. अवघ्या १२ दिवसांपूर्वीच त्यांचा विवाह झाला होता. पत्नी कर्तव्यावर गेलेली असताना त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून ◀◀ पान ३ वर



## अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांचा छापा

### ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ५ लाख ६ हजाराचा मुद्देमाल जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

अवैध वाळू उत्खनन व वाहतुकी विरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई करत दि २६ मे मंगळवार रोजी ट्रॅक्टर-ट्रॉलीसह सुमारे ५ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल कुमार (आयपीएस) यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांना २६ मे मंगळवार रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सुरुमगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून ट्रॅक्टरद्वारे वाहतूक केली जात असल्याचे समजले. या माहितीच्या आधारे माजलगाव ग्रामीण पोलिसांनी सकाळी ७:०० वाजता सापळा रचून छापा टाकला.

कारवाई दरम्यान पोलिसांनी एक ट्रॅक्टर-ट्रॉली व त्यामधील वाळू असा एकूण ५ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.यामध्ये अंदाजे ५ लाख रुपये किमतीचे वाहन आणि ६ हजार रुपये किमतीची वाळू समाविष्ट आहे. जप्तीची प्रक्रिया दोन पंचांच्या उपस्थितीत पूर्ण करण्यात आली.सदर वाहनाचा चालक व मालक ◀◀ पान ३ वर

## खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांचा २९ मे रोजी बीड जिल्ह्यात शिवसंवाद दौरा!

बीड । प्रतिनिधी

राज्यभरात शिवसेना पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी संसदरत्न डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी महाराष्ट्रभर शिवसंवाद दौऱ्याची कंबर कसली असून दि. २९ मे २०२६ रोजी त्यांचा महत्त्वपूर्ण बीड जिल्हा दौरा पार पडणार आहे. या दौऱ्यात बीड जिल्ह्यातील विविध मतदारसंघांमध्ये तळागाळातील शिवसैनिक, ◀◀ पान ३ वर



**सर्व पदाधिकारी-शिवसैनिकांनी आवर्जून उपस्थित राहावे-जगताप, मुळूक, गलधर, नवले**

## ऑनलाईन चक्री जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ५५ हजारांच्या मुद्देमालासह एकाला अटक

बीड (प्रतिनिधी):

शहरातील नगर रोड भागातील बालेपीर परिसरात सुरू असलेल्या एका अवैध ऑनलाईन चक्री जुगार अड्ड्यावर शिवाजीनगर पोलिसांनी मंगळवारी (२६ मे) सायंकाळी अचानक छापा टाकला. या धडक कारवाईत पोलिसांनी एका आरोपीला रंगेहात पकडले असून, त्याच्याकडून कॉम्प्युटर आणि रोख रक्कमेसह एकूण ५५ हजार



१५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक नगर रोड परिसरात पेट्रोलिंग करत असताना, एका गुप्त बातमीदाराकडून पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली. नगर रोडवरील मुज्जू कुशन वर्कच्या पाठीमागे, एका पत्र्याच्या शेडसमोर ◀◀ पान ३ वर

## जायकवाडीच्या पाण्यासाठी बैलगाडी मोर्चात सहभागी व्हावे -प्रियंका खेडकर

माद‌ळमोही । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, गोदावरी सिंदफणा नदीजोड प्रकल्प व्हावा व उप कालवा करावा यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर येत्या २९ मे रोजी बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन चंकलंबा गावचे संरपंच सौ,प्रियंकाताई खेडकर यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यात पाऊस कमी होत असल्याने येथील शेतीला



सातत्याने दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागते . सततच्या दुष्काळामुळे शेती संकटात येते. शेतीवर जो खर्च झाला तोही निघत नसल्याने ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk